



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक १४८ * नांदेड * गुरूवार, दि. ४ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


## ममता बॅनर्जींना धक्क्यावर धक्के

# एकाच दिवशी ८० पैकी ६० आमदार फुटले, पुतण्या अभिषेक बॅनर्जींच्या घरी ईडीची धाड

**कोलकाता (प्रतिनिधी)–** सत्ता गेल्यानंतर पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना एकाच दिवशी दोन मोठे धक्के बसले आहेत. एकीकडे तृणमूल काँग्रेसमध्ये मोठी फूट पडली आहे, ममता बॅनर्जी यांच्या ६० आमदारांनी वेगळा गट स्थापन केला आहे. त्याचवेळी दुसरीकडे, ममता बॅनर्जी यांचे पुतणे खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्या घरी ईडीची धाड पडली आहे. ईडीच्या चार टीम अभिषेक बॅनर्जी यांच्या घरी पोहोचल्या असून त्यांची चौकशी केली जाणार आहे.



विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर आता पश्चिम बंगालचे राजकारण चांगलंच तापलं आहे. ममता बॅनर्जी यांनी तृणमूलमधून हकालपट्टी केलेल्या ऋतब्रत बनर्जी यांनी वेगळा गट स्थापन केला आहे. पक्षाच्या ८० पैकी ६० खासदारांनी ऋतब्रत बनर्जी यांच्या नेतृत्वाखाली हा गट स्थापन केला असून त्याला विधानसभा अध्यक्षांनीही मंजुरी दिली आहे.

पक्षाच्या ८० पैकी ६० आमदारांनी ऋतब्रत बनर्जी यांना पाठिंबा दिल्यानंतर ममता बॅनर्जी यांच्याकडे २० आमदार उरले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसप्रमाणेच पश्चिम बंगालमध्ये आता ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस पक्षदेखील फुटणार हे स्पष्ट झालं आहे.

दुसरीकडे, ममता बॅनर्जी यांचे पुतणे अभिषेक बॅनर्जी हेदेखील चांगलेच अडचणीत आल्याचं दिसतंय. अभिषेक बॅनर्जी यांच्या घरी ईडीने धाड टाकली आहे. ईडीच्या चार टीम अभिषेक बॅनर्जी यांच्या घरी पोहोचल्या असून आता त्यांची चौकशी केली जाणार आहे.

पश्चिम बंगालच्या निकालानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये अंतर्गत वाद निर्माण झाल्यानंतर ममता बॅनर्जी यांनी ऋतब्रत बनर्जी आणि संदीपन शाह यांची पक्षातून हकालपट्टी केली होती. त्यानंतर पक्षातील वाद आणखीनच चव्हाट्यावर आला, ऋतब्रत बनर्जी आणि त्यांच्यासोबत असलेल्या आमदारांनी अभिषेक बॅनर्जी यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. ऋतब्रत बनर्जी यांनी त्यांच्यासोबत असलेल्या ५८ आमदारांच्या सह्यांचे पत्र विधानसभा अध्यक्षांना दिलं. त्याचवेळी आणखी दोन आमदार, असे ६० आमदार आपल्यासोबत असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

## डी.के. शिवकुमार यांनी घेतली मुख्यमंत्रीपदाची शपथ

**बंगळुरू (प्रतिनिधी)–** डी.के.शिवकुमार यांनी हातात संविधान घेऊन कर्नाटकचे २४ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. ३० मे रोजी झालेल्या काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत शिवकुमार यांची पक्षाचे नेते म्हणून निवड झाली होती. जी. परमेश्वर यांनी नवीन उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचे पुत्र आणि विधान परिषद सदस्य (एमएलसी) यतींद्र सिद्धरामय्या यांच्यासह इतर १४ आमदारांनीही मंत्री म्हणून शपथ घेतली.

शिवकुमार हे सिद्धरामय्या यांची जागा मुख्यमंत्री म्हणून घेतील. सिद्धरामय्या यांनी २८ मे रोजी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. त्यांनी २० मे २०२३ ते २८ मे २०२६ पर्यंत मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले. याव्यतिरिक्त, के. जी. जॉर्ज, एम. बी. पाटील, रामलिंगा रेड्डी, सतीश जाखोली, कृष्णा बायरेगौडा, प्रियांक खर्गे, यू. टी. खेदर, ईश्वर खंड्रे, यतींद्र सिद्धरामय्या, बायराथी सुरेश आणि शरण प्रकाश पाटील यांनी मंत्री म्हणून शपथ घेतली.

पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार सिद्धरामय्या यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर ही जबाबदारी डी. के. शिवकुमार यांच्याकडे सोपवण्यात आली. शिवकुमार यांनी राज्यकारभारासाठी आपले प्राधान्यक्रम स्पष्ट केले आहेत.

## स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणूक

# खासदार अशोकराव चव्हाण आणि आमदार चिखलीकर एकत्र!

### आज पत्रकार परिषदेत करणार जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीत नांदेडमध्ये मोठा ट्विस्ट येताना दिसत आहे. या निवडणुकीत एकमेकांचे कट्टर प्रतिस्पर्धी म्हणून चर्चा सुरू असलेले खासदार अशोकराव चव्हाण आणि आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे एकत्र येत असल्याचे दिसून येत आहे. याबाबतची अधिकृत घोषणा आज गुरुवारी या दोन्ही नेत्यांच्या संयुक्त पत्रकार परिषदेत होणार आहे.



नांदेड स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधानपरिषद निवडणुकीत चांगलाच रंग भरलेला आहे. या निवडणुकीसाठी सत्ताधारी भाजपसह राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), महाविकास आघाडीतील काँग्रेस पक्ष, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) यांच्यासह अनेकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे या निवडणुकीत रंग भरल्याचे दिसून येत होते; मात्र आता यात ट्विस्ट आला आहे.

या निवडणुकीतील कट्टर विरोधक किंवा कट्टर प्रतिस्पर्धी म्हणून पाहिले जात असलेले भाजप नेते माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हेच एकत्र येणार आहेत. त्यामुळे भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांच्या नगरसेवकांची अर्थात मतदारांची संख्या पाहता ही निवडणूक काहीशी एकतर्फी होईल असे चित्र निर्माण झाले आहे.

खासदार अशोकराव चव्हाण आणि आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या संयुक्त पत्रकार परिषदेचे आज गुरुवारी आयोजन करण्यात आले आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने खासदार अशोकराव चव्हाण हे आमदार चिखलीकर यांच्या निवासस्थानी जाणार असून आमदार चिखलीकर यांच्या वसंतनगर येथील निवासस्थानी ही पत्रकार परिषद होणार आहे. ही माहिती आमदार चिखलीकर यांच्या वतीने देण्यात आली आहे.

हे दोन्ही नेते एकत्र येणार असल्याने नांदेड विधान परिषद निवडणुकीत सत्ताधारी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र लढणार हे स्पष्ट होत आहे त्यामुळे महायुतीचे भाजप उमेदवार अमर राजूरकर यांचे पारडे जड झाल्याचे या एकंदर बदलत्या राजकीय स्थितीवरून दिसून येत आहे.

#### संघर्षानंतर आता पुन्हा एकत्र

माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर तत्कालीन भाजप खासदार चिखलीकर आणि अशोकराव चव्हाण यांच्यात काही दिवस काही दिवस गुण्यागोविंदाने गेले, मात्र लोकसभा निवडणूक आणि त्यानंतर झालेली विधानसभा निवडणूक यादरम्यान या दोन्ही नेत्यांमध्ये पुन्हा राजकीय संघर्ष सुरू झाला. आता पुन्हा हे दोन्ही नेते एकत्र आल्याचे दिसून येत असून यामुळे नांदेडच्या विधान परिषद निवडणुकीत एक मोठा ट्विस्ट आल्याचे दिसून येत आहे. या दोन नेत्यांमधील हा एकोपा कायम राहिल्यास येणाऱ्या काळात जिल्हा परिषद निवडणुकीतही नांदेड जिल्ह्यातील राजकीय चित्र बदलल्याचे दिसून येणार आहे.

## दिल्लीत हॉटेलमध्ये भीषण आग, आतापर्यंत २१ जणांचा होरपळून मृत्यू

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** राजधानी दिल्लीतील मालवीय नगरमध्ये आगीची भीषण घटना घडली असून एका पंचतारांकीत हॉटेलमध्ये लागलेल्या आगीत होरपळून २१ जणांचा मृत्यू झाला आहे.

दिल्लीतील लेमन ग्रीन नावाच्या रेस्टॉरंटमध्ये बुधवार सकाळी ९.४५ वाजता आग लागल्याची घटना घडली. याबाबत माहिती मिळताच दिल्ली अग्निशमन सेवाने घटनास्थळी धाव घेतली, त्यानंतर येथील इमारतीमधून ३७ नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. मात्र, या आगीत २१ जणांचा मृत्यू झाला असून अनेक लोक गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना सध्या जवळील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



डीडीएमए दक्षिण जिल्ह्याचे उपविभागीय दंडाधिकारी जितेंद्र कुमार यांनी सांगितले की, सकाळी घटनेची माहिती मिळताच आम्ही तातडीने यंत्रणा सक्रिय केली आणि सर्व संबंधित पथकांना घटनास्थळी रवाना करण्यात आले. या इमारतीच्या तळमजल्यावर एक हॉटेल सुरू होते. आगीचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही, मात्र प्राथमिक माहितीनुसार त्या हॉटेलमधूनच आग लागल्याची शक्यता आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, इमारतीत आग वेगाने पसरल्यानंतर बाहेर पडण्याचे सर्व मार्ग बंद झाले होते. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी इमारतीसमोरील जमिनीवर गाद्या टाकून बचावाची व्यवस्था केली. त्यानंतर अनेकांनी जीव वाचवण्यासाठी बाल्कनी, खिडक्या आणि इमारतीच्या वरच्या मजल्यांवरून खाली उड्या मारल्या. दरम्यान, निवासी भागांमध्ये किती हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना व्यवसायासाठी परवाना देण्यात आला आहे, याबाबतची माहिती महानगरपालिका प्रशासनाकडे मागवण्यात आली आहे. तसेच अशा सर्व आस्थापनांची नियमित तपासणी करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही दिल्लीतील आगीच्या घटनेवर शोक व्यक्त केला आहे. मालवीय नगर येथील दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांप्रती मी सहवेदना व्यक्त करतो. तसेच, आगीच्या घटनेत जखमी झालेल्यांच्या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करत असल्याचं ट्विट मोदींनी केलं आहे. तर, दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना २ लाखांची आर्थिक मदत व जखमींना ५० हजार रुपये पंतप्रधान निधीतून देण्यात येतील, असेही त्यांनी जाहीर केले.

## 'एअर इंडिया' ची इमारत अखेर राज्य सरकारच्या ताब्यात

**मुंबई (प्रतिनिधी)–** नरीमन पॉईंट येथील समुद्र किनाऱ्यालगत २२ मजली एअर इंडिया इमारत आता सरकारच्या ताब्यात आली आहे. १६०१ कोटी रुपयांत एअर इंडिया सेट होल्डिंग कंपनीकडून ही इमारत सरकारने खरेदी केली असून याविषयीचा हक्क समर्पण करारनामा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मंगळवारी पार पडला.

मागील काही वर्षांपासून ही इमारत खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू होती. अखेर वित्त विभागाकडून यासाठी आवश्यक असलेला निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आल्यानंतर या इमारतीची खरेदी प्रक्रिया मंगळवारी पार पडली. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि एअर इंडिया सेट होल्डिंग कंपनी यांच्यात हा हक्क समर्पण करार झाला आहे.

## नांदेड विधान परिषद निवडणुकीचे आज होणार चित्र स्पष्ट

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ निवडणुकीत ८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. राज्यभरात माघारीसाठी बंडखोरांची समजूत घालून अधिकृत उमेदवारांच्या विजयाचे मार्ग सुकर केले जात असताना नांदेडमध्ये माघारीच्या हालचालींना वेग आला आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत आज गुरुवार, दि. ४ जून रोजी संपत आहे. महायुती आणि महाविकास आघाडीतील बंडखोर व इच्छुक उमेदवार आपल्या उमेदवारीवर ठाम दिसत आहेत. परंतु आज उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम दिवशी संपूर्ण चित्र स्पष्ट होणार आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील १७ जागांसाठी विधान परिषद निवडणुकीची प्रक्रिया सुरू असून अनेक ठिकाणी बंडखोरीमुळे राजकीय समीकरणे बदलत आहेत. राज्यातील चार मतदारसंघांत भाजपप्रणित महायुतीने विजयाचा मार्ग सुकर केला आहे. नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात उमेदवारी अर्जाच्या छाननीनंतर आठ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. सत्ताधारी महायुतीकडून भाजपने माजी आमदार तथा भाजपचे महानगर अध्यक्ष अमरनाथ राजूरकर यांना अधिकृत उमेदवारी दिली आहे. मात्र महायुतीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून विद्यमान आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांचे पुत्र व माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण पाटील चिखलीकर यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून महायुतीसमोरच पेच निर्माण केला होता. तर



महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर आणि रामदास पाटील सुमठाणकर यांनी अर्ज दाखल केला आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे पुत्र कृष्णा पाटील आष्टीकर व माजी जि. प. सदस्य ज्योतिबा खराटे यांचे अर्ज वैध ठरले आहेत. तर वंचित बहुजन आघाडीकडून काँग्रेस प्रणित आघाडीचे नगरसेवक तथा मनपा गटनेते प्रशांत इंगोले यांनी अर्ज दाखल केला असून अपक्ष उमेदवार पंकज माणिकराव गायकवाड यांचाही अर्ज वैध ठरला आहे.


आता खा. अशोकराव चव्हाण आणि आ. प्रतापराव पाटील चिखलीकर हे एकत्र येत असल्याने चित्र पूर्णपणे बदलणार आहे. तरीही शिवसेना ठाकरे गटाचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांचे पुत्र कृष्णा पाटील तसेच काँग्रेसचे माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर यांच्यासह इतर उमेदवारांच्या भुमिकेकडे आज सर्वांचे लक्ष असणार आहे.

## कॉक्रोच जनता पार्टीचे ६ जून रोजी आंदोलन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारतीय कॉक्रोच पार्टीला देशातील तरुणाईचा चांगला प्रतिसाद मिळताना दिसून येत आहे. महाराष्ट्रातील तरुण असलेल्या अभिजीत दीपके यांनी या कॉक्रोच जनता पार्टीची स्थापना केली आहे. दरम्यान आतापर्यंत ही पार्टी फक्त सोशल मीडियावरच सक्रिय होती. परंतु आता पहिल्यांदाच ही पार्टी प्रत्यक्षात मैदानात उतरणार आहे. तरुणाईचे विविध प्रश्न घेऊन येत्या ६ जून रोजी कॉक्रोच जनता पार्टी आंदोलन करणार आहे.

बुधवारी या सर्व पार्श्वभूमीवर कॉक्रोच जनता पार्टीची महत्त्वाची पत्रकार परिषद पार पडली. कॉक्रोच जनता पार्टीचे प्रवक्ते सौरव दास, विजेता दहिया आणि आशुतोष रांका यांनी या पत्रकार परिषदेमधून ६ जून रोजी होणाऱ्या आंदोलनाबाबत कॉक्रोच जनता पार्टीची भूमिका मांडली आहे. पक्ष, झेंडा बाजूला ठेऊन सगळ्यांनी या आंदोलनात सहभागी व्हा असं आवाहन या पार्टीच्या वतीने करण्यात आलं आहे.

कॉक्रोच जनता पार्टी ही तरुणांची चळवळ आहे. आम्हाला देशभरातून मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत आहे. अभिजीत दीपके दिल्लीत येत आहेत, त्यांनी शांततेत आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. सगळ्यांनी या आंदोलनात सहभागी व्हाव, सोनम वांगचुक देखील या आंदोलनात सहभागी होणार आहेत. ६ जून रोजी अभिजित दीपके दिल्लीत येत आहेत. सकाळी ८ वाजता दीपके दिल्ली विमानतळावर पोहोचतील, आम्ही सगळे सोनम वांगचुक यांच्यासह विमानतळावर असू, तिथून आम्ही पार्लमेंट स्ट्रीट पोलीस स्टेशनला जाणार आहोत. तिथून आम्ही जंतर मंतरवर शांततेत आंदोलन करणार आहोत. सगळ्या लोकांचं या आंदोलनात स्वागत आहे. किती लोक ६ तारखेच्या आंदोलनात सहभागी होतील, हे आज सांगता येणार नाही, असे ते म्हणाले.




## पाकिस्तान कनेक्शनचा संशय; नांदेडमधील काही जणांची एटीएसकडून चौकशी



**नांदेड (प्रतिनिधी)–** देशविरोधी कारवायांमध्ये पाकिस्तानी दहशतवादी शहजाद भट्टी याचे काही समर्थक त्यांच्या सोशल माध्यमावर सक्रिय होत असल्याचे एटीएस पथकाच्या तपासात निष्पन्न झाल्याने शहरात दुसऱ्यांदा काही फॉलोवर्सला तपासण्यात आले आहे. ही कारवाई नांदेड एटीएसने बुधवारी शहराच्या विविध भागात केली.

भारतात देशविरोधी कारवायामध्ये पाकिस्तानी इन्फ्ल्यूसर दहशतवादी शहजाद भट्टी समावेश असल्याने तो राष्ट्रीय तपास यंत्रणाच्या रडाररवर आहे. या इन्फ्ल्यूसरला फॉलो करणाऱ्या किंवा त्याच्या संपर्कात आल्याच्या संशयावरून एटीएसने सात ते आठ तरुणांची चौकशी केल्याची माहिती आहे. नांदेड आणि परभणीमधील तरुणांची चौकशी झाल्याची सुध्दा माहिती आहे. पण या तरुणांचा कुठलाही थेट संबंध नसल्याने चौकशी करून त्यांना सोडून देण्यात आल्याची माहिती आहे. एकूणच पुन्हा एकदा या प्रकरणात सोशल मीडिया इन्फ्ल्यूसर रडारवर आल्याचे दिसत आहे. यापूर्वी एटीएसने १३ मे रोजी नांदेड शहरात काही युवकांना आपल्या ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी केली होती. त्यावेळेसही या तरुणांचा थेट संपर्क येत नसल्याने त्यांना नोटीस देऊन सोडण्यात आल्याचे सांगण्यात आले होते.



**उमेदवार एकत्र : नांदेड–** माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर शिंदे यांनी दोन प्रमुख उमेदवारांना एकत्र आणण्याचा योग साधला. भाजपचे महानगर अध्यक्ष अमर राजूरकर यांना नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील विधान परिषदेची उमेदवारी जाहीर झाल्याबद्दल मनोहर शिंदे यांनी त्यांचा सत्कार केला विशेष बाब म्हणजे यावेळी काँग्रेस उमेदवार रामदास पाटील सुमठाणकर हेही उपस्थित होते. याप्रसंगीच्या छायाचित्रात मनपा स्थायी समितीचे माजी सभापती किशोर स्वामी, रमेश वाघमारे, निलेश भालके आदी दिसत आहेत.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# महिलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष: पण कोण विचारात घेतोय!

देश प्रगतीच्या मोठमोठ्या घोषणा करत आहे. स्मार्ट सिटी, डिजिटल इंडिया, महिला सक्षमीकरण आणि आरोग्यदायी समाजाचे दावे सातत्याने केले जात आहेत. परंतु वास्तवाच्या जमिनीवर उभे राहून पाहिले, तर आजही लाखो महिलांना घराबाहेर पडताना सर्वात मूलभूत प्रश्न पडतो, स्वच्छतागृह कुठे आहे? हा प्रश्न केवळ सुविधा नसल्याचा नाही, तर तो महिलांच्या सन्मान, आरोग्य आणि सुरक्षिततेशी थेट जोडलेला आहे. दुर्दैवाने या प्रश्नाकडे प्रशासन आणि समाज दोघांनीही दीर्घकाळ दुर्लक्ष केले आहे. शहरात लाखो महिला दररोज शिक्षण, नोकरी, व्यवसाय किंवा इतर कारणांसाठी घराबाहेर पडतात. मात्र त्यांच्या तुलनेत सार्वजनिक स्वच्छतागृहांची संख्या अत्यल्प आहे. उपलब्ध स्वच्छतागृहे अनेकदा अस्वच्छ, असुरक्षित आणि वापरण्यायोग्य नसतात. परिणामी अनेक महिलांना तासन्तास लघवी रोखून धरावी लागते. याचा थेट परिणाम त्यांच्या आरोग्यावर होत असून, मूत्रमार्गाचे संसर्ग, किडनीचे आजार आणि इतर गंभीर समस्या वाढत आहेत. स्त्रीरोग विभागात मोठ्या प्रमाणात महिलांमध्ये ॲनिमिया आणि मूत्रमार्गाचे आजार आढळत असल्याची बाब अत्यंत चिंताजनक आहे. ही परिस्थिती केवळ आरोग्यव्यवस्थेचे अपयश नाही, तर समाजातील स्त्रीविषयक असंवेदनशीलतेचेही प्रतीक आहे. महिलांना घर, कुटुंब, नोकरी आणि समाज यांच्यात सतत तारेवरची कसरत करावी लागते. मात्र त्यांच्या मूलभूत गरजांकडे कायम दुय्यम नजरेने पाहिले जाते. पुरुषांसाठी सहज उपलब्ध असणाऱ्या सुविधा महिलांसाठी आजही संघर्षाचा विषय का ठरतात? विकासाच्या आराखड्यांमध्ये महिलांच्या गरजांना प्राधान्य का दिले जात नाही? हे प्रश्न आता गंभीरपणे विचारण्याची वेळ आली आहे. महिलांवरील अन्याय केवळ स्वच्छतागृहांच्या अभावापुरता मर्यादित नाही. मासिक पाळीसारख्या नैसर्गिक प्रक्रियेबाबत आजही समाजात गैरसमज, संकोच आणि अज्ञान आहे. ग्रामीण भागात तर अनेक महिलांना अजूनही सुरक्षित सॅनिटरी नॅपकिनसारखी साधने उपलब्ध नाहीत. आरोग्यविषयक माहितीचा अभाव, आर्थिक अडचणी आणि सामाजिक दबाव यामुळे त्या अस्वच्छ पर्यायांचा वापर करतात. त्यातून संसर्ग आणि गंभीर आजार निर्माण होतात. हे वास्तव अत्यंत वेदनादायी आहे. महिलांच्या आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष अनेकदा त्यांच्या स्वतःच्या आयुष्यातील भूमिकांमुळेही वाढते. घरातील सर्वांची काळजी घेताना त्या स्वतःकडे दुर्लक्ष करतात. थकवा, चक्कर येणे, अशक्तपणा किंवा इतर लक्षणांकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. परिणामी अनेक आजार शेवटच्या टप्प्यात आढळतात. समाजाने महिलांना त्यागाची मूर्ती म्हणून गौरविण्यापेक्षा त्यांना स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य देण्याचा अधिकार आणि वातावरण निर्माण करणे अधिक गरजेचे आहे. आज महिलांवर होणारा अन्याय विविध स्वरूपात दिसतो. शिक्षणातील असमानता, सुरक्षिततेचा अभाव, कार्यस्थळी होणारा भेदभाव, आरोग्यसेवेतील दुर्लक्ष आणि सार्वजनिक सुविधांतील कमतरता या सगळ्या गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या आहेत. एका बाजूला महिला अंतराळ मोहिमा गाठत आहेत, तर दुसऱ्या बाजूला अनेक महिलांना स्वच्छ आणि सुरक्षित स्वच्छतागृहाची सुविधा मिळत नाही, ही विसंगती लाजिरवाणी आहे. महिला आरोग्य दिन आणि मासिक पाळी स्वच्छता दिन साजरे करण्यामागचा उद्देश केवळ जनजागृती नसून महिलांच्या आरोग्याला मानवी हक्क म्हणून मान्यता देणे हा आहे. पण तो केवळ सध्या शासकीय औपचारिकतेचाच भाग झालेला आहे. असं केवळ एक दिवस संदेश देऊन परिस्थिती बदलणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्था, प्रशासन आणि सरकार यांनी महिलांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि पुरेशी सार्वजनिक स्वच्छतागृहे उभारणे ही प्राथमिक जबाबदारी मानली पाहिजे. प्रत्येक बाजारपेठ, बसस्थानक, शासकीय कार्यालय आणि सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी दर्जेदार सुविधा असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर शाळा आणि महाविद्यालयांमध्ये मासिक पाळी, पोषण आणि महिला आरोग्याविषयी वैज्ञानिक माहिती देणे गरजेचे आहे. आरोग्य तपासणी सहज उपलब्ध व्हावी, ॲनिमिया निर्मूलनासाठी प्रभावी मोहिमा राबवाव्यात आणि महिलांना आरोग्यविषयक निर्णयांमध्ये स्वातंत्र्य द्यावे लागेल. एखाद्या समाजाची खरी प्रगती ही तेथील महिलांच्या सन्मान, सुरक्षितता आणि आरोग्यावर मोजली जाते. महिलांना मूलभूत सुविधा नाकारून विकासाचे दावे करणे म्हणजे वास्तवा-पासून पळ काढण्यासारखे आहे. एरव्ही सातत्याने प्रसिद्धीच्या झोतात राहणारा महिला आयोग देखील याकडे दुर्लक्ष करीत आहे. कदाचित यातून त्यांना काही फायदा मिळणार नसेल. म्हणूनच आता प्रश्न फक्त स्वच्छतागृहांचा नाही, तर महिलांना समान माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा आहे. समाज आणि प्रशासनाने हा प्रश्न तातडीने सोडवला नाही, तर महिला सक्षमीकरणाच्या घोषणा केवळ कागदावरच राहतील.

# दिशाहीन कुटुंबातील स्त्रियांची अमानवी होरपळ

संतोषराव दुपारचे जेवण आटोपून नेहमीच्या सवयीप्रमाणे वामकुक्षी घेण्यासाठी आडवे झाले. आता किमान १५,२० मिनिटे तरी कुणी काही त्रास देऊ नये, अशी त्यांची मनस्वी ईच्छा. स्वविश्वात जगणारा तरीही आपल्या शब्दातून विश्वाशी नाते जोडणारे संतोषराव घाटपांडे हे एक अफलातून. स्वस्पर्शी सहृदयी असे हे व्यक्तिमत्व. आपल्या भावविश्वाशी जोडलेले नाते एखाद्या व्यक्तीने आपल्या अविचारी कृत्याने सहज तोडून टाकणे त्यांना कधी आवडत नव्हते. त्यांच्या एकांत प्रियतेची तार तुटली. घरकाम करणारी मोलकरीण आज अवेळी आली. अधूनमधून अशीच ही सांगितलेल्या वेळेवर येत नाही, आणि दुपारचे जागरण घडविणार. गेट उघडणे आणि तिचे काम संपेपर्यंत वामकुक्षीला ब्रेक देणे या ज्येष्ठ नागरिकाला थोडे त्रासाचेच झाले. तेवढ्यात तिचा क्षीण आणि असहाय्य आवाज, काका मले चहा करून

द्या नं घरकाम करणारी शेवंताबाई म्हणाली. संतोषराव थोडे अधिकच त्रस्त झाले. एकतर दुपारची वामकुक्षी मोडली या बाईने, बरं आता आपलं घरकाम उरकुन निघून जायचं, या बाईला चहा करून द्यायला. आता घरी कुणी नाही आणि ही चक्क आपल्याला ऑर्डर देते. ते मनातून थोडे वैतागले.

गॅसच्या ओट्यापर्यंत जाऊन त्यांनी सर्व साहित्याची शोधाशोध केली. चहा करून एकदाचा शेवंताबाईला दिला.आता बाईने चहा घेऊन आपले काम करावं आन चुपचाप निघून जावं. ही संतोषरावांची अपेक्षा. ते परत आराम करण्यासाठी आपल्या बिछान्याकडे वळले. इतक्यात बाईचा पुन्हा आवाज, काका आज माह्या पोरानं मले मारलं. संतोषरावांच्या काळजाचा ठोका वाढला ते एकदम दचकून म्हणाले, काय! कदाचित यापूर्वी त्यांनी अशी घटना ऐकली नसावी. संतोषराव म्हणाले, मग त्याच्या बापाला तू का सांगितलं नाही. त्यावर उत्तर, काका त्याचा बाप जाऊन त पाच वर्स झाली ना, आन असता तरी पण काही फरक नसता पडला. तेव बी मरनाची दारू प्यायचा, मी म्हणायचे आतडे खराब होतील न. त मलेच वंगाळ शिव्या देऊन रपरप मारायचा. लहानपणी महाबाप मारायचा, लगन झाल्यावर नवरा आन आता माहे दोन्ही लेकरं मले मारतात.

संतोषरावाला आतून चर्र होऊन गेले. असे काही घडू शकते, यावर त्यांचा विश्वासच बसत नव्हता.शेवंताबाई पुढं सांगू लागल्या, काका पोरगं तंबाखू, खर्रा, बिड्या, दारू सगळ्या व्यसनानं वाया गेलं. आता दुसरं पोरगं पण त्याच्या वरच गेलं. मले दोन पोरी पण हाये. मोठी पोरगी माह्या-सारखं घरकाम करते. दोन पोरींचे लग्न करावं लागणार हाईत. घरात पैसे ठेवले त पोरं लगेच काढून घेतात. आन व्यसनात उधळतात. महा जीव त कावून गेला काका. आता बँकेत पैसे टाकले त पोरगं म्हणते



बँकेचं पुस्तक कुठी ठेवलं !

मग कुठे ठेवलं तू संतोषराव चक्रालेल्या अवस्थेतच बोलले. त्यावर ती म्हणाली माह्या ननदेच्या घरी काका. त पोरगं म्हणते ते पुस्तक आगुदर आन नाहीत घरात राहू नको. तुह्या माहेराले निघून जा. घरात आणखी कोण आहे? संतोषरावाचा प्रश्न, आंधळी सासू आहे एका जागी बसलेली असते पण म्हणते, पैसे आणले की माह्या जवळ ठेवायले दे. आता काका ईच्या जवळ देऊन कसं चाललं, तुम्हीच सांगा इले त ईचा जीव बी संभाळता येत नाही. मांघ माह्या घरात दिवसा चोरी झाली. सासू घरात होती, तरीपण तिच्या म्होर घरातले सगळे भांडे नेले. मग तू पोलीसस्टेशनला तक्रार का केली नाही? संतोषरावचा प्रश्न. तक्रार कशी करू काका भांडे चोरणारे माह्या जाऊचेच पोरं होते.

गेले होते भांडायलं, पण तेच सगळे तुटून पडले मह्यावर मव्हळाच्या माश्यासारखे. त्यावर संतोषराव म्हणाले, त्यावेळी तुझी मुलं काय करत होती, शेवंताबाई म्हणाली, त्यादिवशी ते दोघबी सुरतले होते. कामाले पाठवले व्हते, माह्या दुसऱ्या देरासंग, पण तिकडेच राह्यले असते आन चार पैसे कमावले असते त म्या माह पोट भरून पोरीच्या लगनासाठी चार पैसे कमावून बाजूला ठेवले असते,पण आले मेले माहा जीव घ्यायले मेहकरात.इथं आमच्या गल्लीत सगळे लोफर काट्टे, संगत चांगली पाहिजे नं काका. त्यात माही सासू त्याहले फुस लावते. म्हणते, शेवंतीकुन पैसे घ्या, तिले धाक दपट करून, आसे लेक आन अशी सासू, माह्या जगण्याले काही अर्थ हाये का काका? असे लेक जलमाले येण्यापक्षा त वांझुटी राह्यली असती त पुरली असती न काका. पोटी लेक आले त सुदे येवाव नाही त आसे भुतं काय कामाचे. काल मले मारल्यावर म्याबी गेले ठेसनात, म्हणलं माह्या पोराले पकडून न्या, पण पोलीस म्हणले मायचा रिपोट चालत नाही. मंग म्हणलं एकदा घरी येऊन पोराह्यले धाक तरी दाखवा.काल एक पोलीस आला बी होता. त्याले पाहून हे दोघेबी गेले पळून. मंग पुन्हा आलाच नाही पोलीस, पोरायची माह्यावर दांडगाई चालूच हाये.

हे सर्व ऐकताना संतोषरावाना गहिवरून आले, पण शेवंताबाई मात्र दगडाच काळीज करून फक्त सगळं सांगत होती. त्या दररोजच्या गाढव मेहनतीची, अपमानास्पद वागणुकीची, बालपणी आपल्या बापाचा, लग्न झाल्यावर नवऱ्याचा व त्याच्या मृत्यूनंतर तिच्याच पोटच्या गोळ्याकडून दररोज ती थापडा खात होती. आन जनावरापेक्षाही बस्तर जगत होती, खरंच शेवंताबाईला अहो रात्र कष्ट करून तिला हे दुष्टचक्र थोडही आनंदानं का नसेल जगू देत, खरचं नियती एवढी निष्ठुर का होत असेल?

तिला शिक्षण नाही, तिच्या जवळ घड्याळ नाही, मोबाईल नाही. त्यामुळे प्रत्येक घरी त्यांनी सांगितलेल्या वेळे-नुसार पोहचाव हेही तिला कळत नाही. मोबाईल नसल्यामुळे केंव्हा येणार? तिला काम देणाऱ्या महिलेला संपर्क करण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे तिला काम देणाऱ्या महिला एवढी ढोर मेहनत करूनही तिच्यावर तोंडसुख घेणार, हे अगदी ठरलेले. सकाळी उठल्यापासून ते रात्री डोळा लागेपर्यंत बिचारी नुसती उरफोड मेहनत करते, पण तिच्या नशिबी सुखाचा शब्द नाही आणि कोणत्या प्रसंगी कुठल्या पातळीवरचा संघर्ष तिला करावा लागणार? सर्वच अनिश्चित.खरंच काय नशीब असते एखाद्याच. मनुष्य जन्म तर मिळतो, पण मिळणाऱ्या अमानुष यातना जनावरापेक्षाही बस्तर.

तिच्या यातना ऐकून घ्यायला कुणाला वेळ नाही. मायेनं, जिव्हाळ्यानं बोलणाऱ्या, वागणाऱ्या संस्कारी जगा-पासून ती आज एकविसाव्या शतकातही हजारो कोस दूर आहे. आपल्या मनाला तिने आता पाषाणा-सारखं कठोर करून घेतलं आहे. संस्कारशून्य जगात वावरणारी माणसं आजही या अवस्थेत जगतात त्या सर्व दुष्टचक्रात प्रामाणिक, मेहनती, सरळमार्गी जगणाऱ्या अनेक शेवंता असतील, किती असतील काय सांगावे? त्यांना एकविसाव्या शतकातल्या या संगणक आणि डिजिटल युगाने कोणती सुखे त्यांच्या आयुष्यात आणली? त्याच्या मेहनतीचे चार पैसे त्यांना स्वतःच्या नावे जमा करता येत नाहीत किंवा खर्चही करता येत नाही.अहोरात्र राबूनही त्यांच्या डोक्यावर सतत टांगती तलवार आहे. तेंव्हा असंख्य दुःखाना तोंड देऊन जगणारी एक आपली भगिनी समजून तिला प्रेम, सहानुभूती दाखविणाऱ्या सुखवस्तू घरातील किती महिला असतील? तिचे कष्ट ती आपल्या कुटुंबाच्या सेवेसाठी देणारं आहेच. आपण देतो त्या मूल्यात तीला सेवा देणे हे क्रमप्राप्त ठरते. पण आपल्या घरी आल्यावर तिच्या कौटुंबिक प्रश्नांचा विचार करून तिचे दुःख हलके करण्यासाठी आम्ही आमच्या पातळीवर काय करू शकतो? हे विचार आज सुशिक्षित सुजाण संस्कारी महिलांनी करणे गरजेचे आहे. याउलट त्यांच्या घरातील भानगडीत आपन कशाला पडायचे? त्यांचं ते पाहून घेतील. हा सूर लावून आपल्या वेळेनुसार व इच्छेनुसार आपले घरकाम फक्त झाले पाहिजे ही यांत्रिकता किमान विचारी मातृहृदयात नसेल तर, अशा पाषाणहृदयी प्रवृत्तीला नेमके काय म्हणावे? कोणतीही मोलकरीण स्त्री जेंव्हा उच्चवर्गीय वसाहतीत येते, तेंव्हा तिच्या कष्टासोबत तिच्या जीवनात आनंद यावा, असा विचार करून त्यासाठी तसे वर्तन करणे यासाठी पैसे द्यावे लागत नाहीत. कष्टाने माणसे कधीच मरत नाहीत. ती मरतात त्यांच्या वाट्याला येणाऱ्या माणुसकीशून्य अमानवी वर्तनामुळे. संतोषरावांच्या डोक्यात असंतोषाचे वादळ निर्माण झाले.

दिशाहीन कुटुंबाचे भविष्य अंधकारमय आहे, पण त्या कुटुंबातील महिला अहोरात्र काबाडकष्ट करतात, पण त्यांच्या जीवनात कोणतेच सुख नाही. नुसती धावपळ, फरपट आणि पुढच्या क्षणाला आपल्या आयुष्यात काय होईल? याची भीती. महिलांचे जीवन बदलावे यासाठी समस्त समाजसेवक व समाजसेविकांनी केलेल्या महान कार्यामुळे आज कोट्यवधी स्त्रियांचे जीवन बदलले आहे, पण शेवंताबाईसारख्या काही स्त्रियांसोबत होणारे अमानवी वर्तन थांबविण्यासाठी आपण काय करू शकतो? हा अत्यंत सहृदयी प्रश्न आपल्या मनाला आपण विचारला पाहिजे. शिक्षण आणि योग्य संस्काराच्या अभावी दिशाहीन मार्गानी भरकटलेले कुटुंब, वाया गेलेली युवा पिढी आणि त्यात त्या कुटुंबातील स्त्रियांची होणारी होरपळ विचारी व सुखवस्तू कुटुंबांतील सर्व सदस्यांनी केली पाहिजे. त्यातही घरातील स्त्रियांची मानसिकता जर उंचावली. तर अशा असाहय्य स्त्रियांचे पुष्कळ प्रश्न कमी होतील. गरज आहे आमच्या शिक्षण व ज्ञानाबरोबर आमच्या मनाची उंची वाढविण्याची.

अशा समस्याग्रस्त स्त्रियांसाठी शासकीय व खाजगी पातळीवर त्यांच्या पुनर्वसनासाठी आज सुविधा उपलब्ध आहेत. योग्यस्थळी त्यांना पोहचवून त्यांचे पुनर्वसन करणे शक्य आहे. त्यासाठी विचारी कुटुंबातील सर्व सदस्यांनी एका सकारात्मक विचारापर्यंत येऊन हे कार्य पूर्णत्वास नेले पाहिजे. संतोषरावांच्या चेहऱ्यावर आता संतोष जाणवू लागला.

**-प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# विनोद सम्राट : अशोक सराफ

मराठी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ विनोदी अभिनेते, विनोद सम्राट, चित्रपट सृष्टीचे मामा, पद्मश्री अशोक सराफ यांचा आज ७९ वा वाढदिवस. विनोदाचा हा सम्राट बघता बघता ७९ वर्षाचा झाला यावर रसिकांचा विश्वास बसणे कठीण असले तरी ते सत्य आहे. अशोक सराफ यांचा जन्म ४ जून १९४७ रोजी मुंबईत झाला. मूळचे बेळगावचे असणारे अशोक सराफ यांचे बालपण मुंबईतील चिखलवाडी भागात गेले. त्यांचे शिक्षण मुंबईतील डी. जी. टी. विद्यालयात झाले. लहानपणा-पासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी ययाती आणि देवयानी या नाटकात विदुषकाची भूमिका साकारली होती.

दादा कोंडके यांच्या पांडू हवालदार या चित्रपटाद्वारे त्यांनी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. या चित्रपटातील त्यांनी साकारलेली इरसाल हवालदाराची भूमिका खूप गाजली. दादा कोंडके यांच्याच राम राम गंगाराम या चित्रपटात त्यांनी म्हमद्या खाटीक ही भूमिका साकारली. कारकिर्दीच्या सुरवातीलाच केलेल्या विनोदी भूमिका लोकप्रिय ठरल्याने त्यांना विनोदी भूमिकाच मिळत गेल्या आणि त्यांनीही त्या भूमिकांना न्याय देऊन प्रेक्षकांना खळखळून हसवले.

८० च्या दशकात लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासमवेत त्यांची जोडी जमली. पडद्यावरील अशोक सराफ आणि लक्षा या जोडीने मराठी चित्रपटसृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. या दोघांनी एकत्र अभिनय केलेल्या अशी ही बनवाबनवी, धुमधडाका, दे दणादण यासारख्या चित्रपटांनी धमाल उडवून दिली. सचिन आणि महेश कोठारे या दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेले व अशोक सराफ यांनी अभिनय केलेले नवरी मिळे नवऱ्याला, आत्मविश्वास, गंमत जंमत, आयत्या घरात घरोबा शुभ मंगल सावधान, आई नंबर वन, एक शेर दुसरी सव्वाशेर , नवरा पावशेर, नवसाचा नवरा, आयडीयाची कल्पना हे चित्रपट देखील लोकप्रिय झाले.

अशोक सराफ यांनी केवळ विनोदी भूमिकाच केल्या असे नाही तर काही गंभीर भूमिका देखील केल्या. वजीर चित्रपटात त्यांनी साकारलेला गंभीर राजकारणी भाव खाऊन गेला तर चौकट राजा चित्रपटातील त्यांनी साकारलेली सहृदय व्यक्तीची भूमिका लोकांच्या मनात घर करून गेली. अशोक सराफ यांनी अभिनय केलेले आई नंबर वन, आत्मविश्वास, नवरी मिळे नवऱ्याला, धुमधडाका, गंमत जंमत, माझा पती करोडपती, दे दणादण, एक डाव भुताचा, भुताचा भाऊ, शेजारी शेजारी, एक उनाड दिवस, अफलातून, गोंधळात गोंधळ, अशी ही बनवाबनवी, सगळीकडे बोंबाबोंब, आयत्या घरात घरोबा, कुंकू, घनचक्कर, वजीर, एकापेक्षा एक, अनपेक्षित, चंगू मंगू, शुभमंगल



सावधान, आमच्या सारखे आम्हीच, बाळाचे बाप ब्रह्मचारी, प्रेम करूया खुल्लम खुल्ला, गोष्ट धमाल नाम्याची, पांडू हवालदार, राम राम गंगाराम, कळत नकळत, अरे संसार संसार, आपली माणसं, एक डाव धोबीपछाड, आयडीयाची कल्पना, साडे माडे तीन हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट विशेष गाजले. त्यांनी केवळ मराठीच नाही तर हिंदी चित्रपटातही काम केले. करण अर्जुन, कुछ तुम कहो कुछ हम कहे, बडे घर की बेटी, बेटी नंबर वन, कोयला, गुप्त, संगदिल सनम, प्यार किया तो डरणा क्या?, जोरू का गुलाम, खूबसुरत, यस बॉस, सिंघम या हिंदी चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका विशेष लक्षात राहण्यासारख्या आहेत. हम पांच, टना टन टन, डोन्ट वरी, हो जायेगा, छोटी बडी बाते यासारख्या काही टीव्ही मालिका देखील त्यांनी केल्या. त्यांनी भूमिका केलेले हमीदा बाईची कोठी, अनधिकृत मनोमिलन, हे राम, कार्डिओग्राम, सारखं छातीत दुखतंय ही नाटकेही खूप गाजली. चित्रपट, टीव्ही, रंगमंच अशा तिन्हीं माध्यमातून त्यांनी आपल्या अभिनयाची मुशाफिरी केली. आपल्या कारकिर्दीत त्यांनी २०० हुन अधिक चित्रपटात भूमीका केल्या.

रंजना, उमा भेंडे, प्रेमा किरण, निवेदिता जोशी, वर्षा उसगावकर, अश्विनी भावे, अलका कुबल, प्रिया बेर्डे, किशोरी शहाणे या आणि अशा अनेक अभिनेत्रींसोबत त्यांनी भूमिका केल्या. विशेष म्हणजे या सर्व अभिनेत्री त्यांना सेटवर मामा म्हणत. आज तर ते संपूर्ण चित्रपट सृष्टीचे मामा झाले आहेत. आज त्यांना अशोकमामा याच नावानेच ओळखले जाते. अशोक सराफ यांना अशोक मामा हे नाव कसे पडले हे पाहणे देखील रंजक आहे. एका चित्रपटाच्या सेटवर प्रकाश शिंदे नावाच्या कॅमेरामन सोबत त्यांची मुलगी येत असत. सेटवर आली की ती विचारत असे, हे कोण ? त्या कॅमेरा-मनने सांगितले हे अशोक सराफ, पण तू यांना मामा म्हणायचे. त्या मुलीसोबत सेटवरील सर्वजण त्यांना मामा म्हणू लागले पुढे हेच नाव रुढ झाले आणि अशोक सराफचे अशोक मामा बनले.

अशोक सराफ यांना मागीलवर्षी पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांनी त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान केला. अशोक मामांना पद्मश्री पुरस्कार मिळाल्यावर संपूर्ण महाराष्ट्रात आनंदोत्सव साजरा करण्यात आला होता. जगभरातील मराठी माणसांनी त्यांना पद्मश्री मिळाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या होत्या. अशोक मामांना अभिनयासाठी मिळालेला हा पहिला पुरस्कार नाही. याआधीही त्यांच्या अभिनयासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत मात्र ते नेहमी म्हणतात की प्रेक्षकांच्या मनात मी स्थान निर्माण करू शकलो हाच माझ्यासाठी सर्वोत्तम पुरस्कार आहे आणि ते सत्यही आहे. अशोक सराफ यांच्यावर मराठी प्रेक्षकांनी जितके प्रेम केले तितके कोणत्याच अभिनेत्यावर केले नसेल. जवळपास पाच दशके आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात आढळ स्थान निर्माण करून प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या या विनोदाच्या अभिनय सम्राटाला ७९ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! परमेश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना! वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा अशोक मामा!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# सरकारी शाळांसमोरील आव्हानांचे वास्तव

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता पहिलीच्या पटसंख्येची घसरती आकडेवारी ही केवळ शैक्षणिक बाब नसून ती समाज, अर्थव्यवस्था आणि शासनाच्या धोरणांशी निगडित असलेल्या व्यापक बदलांची नोंद आहे. शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार गेल्या चार वर्षांत पहिलीच्या वर्गातील विद्यार्थीसंख्या तब्बल एक लाख सदतीस हजारांनी घटली आहे. विशेष म्हणजे शाळा प्रवेशोत्सव, लोकप्रतिनिधींच्या भेटी, विविध योजनांचा प्रचार आणि विद्यार्थ्यांच्या स्वागताचे कार्यक्रम यांसारखे उपक्रम राबवूनही ही घसरण पूर्णपणे थांबलेली नाही. त्यामुळे या प्रश्नाकडे केवळ आकड्यांच्या चष्म्यातून नव्हे, तर शिक्षणव्यवस्थेच्या भवितव्याच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

एकेकाळी ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांच्या मुलांसाठी सरकारी शाळा हेच शिक्षणाचे मुख्य केंद्र होते. आज मात्र परिस्थिती बदलत आहे. पालकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. इंग्रजी माध्यम, आधुनिक सुविधा, डिजिटल वर्गखोल्या आणि आकर्षक शैक्षणिक वातावरण यांची मागणी वाढली आहे. परिणामी, अनेक पालक खासगी शाळांकडे वळत आहेत. सीबीएसई आणि इतर राष्ट्रीय शिक्षण मंडळांशी संलग्न असलेल्या शाळांची वाढ ही या बदलत्या प्रवाहाचीच साक्ष आहे.

मात्र, यासाठी केवळ पालकांना दोष देता येणार नाही. सरकारी शाळांच्या प्रतिमेला धक्का पोहोचण्यामागे अनेक वस्तुनिष्ठ कारणे आहेत. अनेक ठिकाणी शिक्षकांची कमतरता, अपुरी पायाभूत सुविधा, डिजिटल साधनांचा अभाव आणि शिक्षकांवर टाकण्यात येणारी शैक्षणिकेतर कामांची जबाबदारी यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. शासनाने विविध योजना जाहीर केल्या असल्या तरी त्या प्रत्येक शाळेपर्यंत प्रभावीपणे पोहोचत आहेत का, हा प्रश्न कायम आहे.

या घसरणीमागे आणखी एक महत्त्वाचा सामाजिक पैलू आहे. राज्यात जन्मदर कमी होत आहे. कुटुंब नियोजनाचा वाढलेला स्वीकार, बदलती जीवनशैली, बेरोजगारीमुळे उशिरा होणारी विवाहे आणि वाढता शैक्षणिक खर्च यांचा परिणाम थेट विद्यार्थ्यांच्या संख्येवर होत आहे. त्यामुळे शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या मुलांची संख्या नैसर्गिकरीत्याच कमी होत आहे. यामुळे केवळ सरकारीच नव्हे, तर भविष्यात संपूर्ण शिक्षण व्यवस्थेलाच नवीन आव्हानांना सामोरे जावे लागू शकते.

तथापि, या निराशाजनक चित्रात आशेचा एक किरणही दिसतो. २०२५-२६ मध्ये पहिलीच्या पटसंख्येतील घट मागील वर्षांच्या तुलनेत कमी झाल्याचा दावा शिक्षण विभागाने केला आहे. सहा जिल्ह्यांमध्ये प्रत्यक्ष पटसंख्या वाढल्याचेही नमूद करण्यात आले आहे. याचा अर्थ योग्य प्रयत्न केल्यास परिस्थिती सुधारण्याची शक्यता अजूनही शिल्लक आहे.

मात्र, शाळा प्रवेशोत्सव साजरे करणे किंवा विद्यार्थ्यांचे औपचारिक स्वागत करणे एवढ्यावरच समाधान मानून चालणार नाही. सरकारी शाळा गुणवत्तेच्या बाबतीत खासगी शाळांशी स्पर्धा करू शकतील, अशी विश्वासार्ह व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. शिक्षकांची रिक्त पदे भरणे, आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे, विद्यार्थीकेंद्रित शिक्षण पद्धती विकसित करणे, पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पालकांचा विश्वास पुन्हा संपादन करणे ही काळाची गरज आहे.

शिक्षण हे कोणत्याही समाजाच्या विकासाचे मूलभूत साधन आहे. सरकारी शाळा कमकुवत होणे म्हणजे समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी संधीची दारे संकुचित होणे होय. त्यामुळे पहिलीच्या वर्गातील घटती पटसंख्या हा केवळ शैक्षणिक आकडा नसून भविष्यातील सामाजिक असमतोलाचा इशारा आहे. या इशाऱ्याकडे गांभीर्याने पाहून सरकारी शाळांना नवसंजीवनी देण्यासाठी शासन, शिक्षक, पालक आणि समाज या सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याची हीच योग्य वेळ आहे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे**
जत, जि. सांगली

# प्रलंबित पीकविम्यासाठी शिवसेनेचा आक्रमक पवित्रा; नांदेडातील विमा कंपनी कार्यालयाला ठोकले टाळे



**नांदेड (प्रतिनिधी)** – खरीप हंगामातील प्रलंबित पीकविमा रक्कम तत्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, या मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने मंगळवार, दि. २ जून रोजी नांदेड येथील ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडिया लिमिटेडच्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी संतप्त शिवसैनिकांनी घोषणाबाजी करत कंपनीच्या कार्यालयाचे शटर बंद करून कुलूप ठोकले.

यंदाच्या खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्यानंतर प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत नांदेड जिल्ह्याकरिता सोयाबीनसह विविध पिकांसाठी एकूण ८८८.६७ कोटी रुपयांचा विमा मंजूर करण्यात आला. त्यापैकी सुमारे ५०२ कोटी रुपयांचे वाटप झाले असले, तरी देगलूर तालुक्यातील सात मंडळांपैकी देगलूर, खानापूर आणि मरखेलसह काही मंडळांतील शेतकरी अद्यापही विमा रकमेपासून बंचित आहेत. शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी खते, बियाणे, कीटकनाशके आणि इतर कृषी साहित्य खरेदी करण्याची निकड असताना विमा रक्कम न मिळाल्याने त्यांच्यासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे.

गेल्या काही वर्षापासून सततच्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आधीच कर्जबाजारी झाला असून, वाढलेल्या कृषी निविष्ठांच्या किमतींमुळे त्यांची अडचण अधिकच वाढली आहे. राज्य शासनाकडून सुमारे ३८५.११ कोटी रुपयांचा निधी अद्याप प्राप्त झाला नसल्याचे कारण देत विमा कंपनीकडून उर्वरित रक्कम वितरित करण्यात आली नाही. यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, मागणी जोर धरत आहे.

शेतकऱ्यांच्या मागणीसाठी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी यापूर्वी उपजिल्हाधिकारी आणि तहसीलदार कार्यालयासमोर निदर्शने केली होती. मात्र त्यानंतरही विमा वाटप न झाल्याने पदाधिकाऱ्यांनी थेट पीकविमा वाटप करण्याची नांदेड येथील विमा कंपनीचे कार्यालय गाठून अधिकाऱ्यांना जाब विचारला. यावेळी अधिकाऱ्यांनी शासनाकडून निधी प्राप्त होताच विमा वितरित करण्यात येईल, असे सांगितले. मात्र या उत्तराने समाधान न झाल्याने शिवसैनिकांनी कंपनीच्या कार्यालयाला कुलूप ठोकत निषेध नोंदविला.

आंदोलनात शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघ प्रमुख पांडुरंग पाटील थडके देगावकर, देगलूर शहरप्रमुख भगवान जाधव, युवासेना तालुका प्रमुख तथा सोशल मीडिया नेटवर्क प्रमुख भागवत पाटील सोमूरकर, सचिन इबितवार तमलूरकर, अर्जुन लुटे अल्लापूरकर यांच्यासह अनेक शिवसैनिक सहभागी झाले होते. दरम्यान, राज्य शासनाने विमा कंपनीकडे अनुदानाची रक्कम तत्काळ वर्ग करावी आणि उर्वरित शेतकऱ्यांना पीकविम्याची रक्कम विलंब न लावता वितरित करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

# प्रवाशांच्या सेवेसाठी एसटी सदैव तत्पर -अशोक चव्हाण



**किनवट (प्रतिनिधी)** –प्रवाशांनी दूरच्या प्रवासाकरिता टू व्हीलर किंवा इतर वाहनांचा वापर करण्यापेक्षा एसटीने प्रवास करावा. प्रवाशांच्या सेवेसाठी एसटी सदैव तत्पर असल्याचे प्रतिपादन आगार प्रमुख अशोक चव्हाण यांनी केले.

किनवट येथील आगारात एसटीच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती राहुल नाईक, नगरसेविका अश्विनी जागरलावार, मराठी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष प्रमोद पहुरकर, मुकुंद नेम्मानीवार, प्रभू कोल्हे, कार्यशाळा अधीक्षक वाय. एच. खिल्लारे व ज्येष्ठ प्रवाशी उपस्थित होते..

बस स्टँडमध्ये महिला प्रवासी व ज्येष्ठ प्रवाशी यांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. सुरुवातीला बोलताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती राहुल नाईक यांनी प्रवाशांच्या सोयीसाठी वेगवेगळ्या उपाययोजना सुचविल्या. त्याचप्रमाणे पत्रकार प्रमोद पोहरकर यांनी देखील आगाराकडून लांब पल्ल्यांच्या गाड्या चालू कराव्यात अशी मागणी केली. अश्विनी जागरलावार यांनी आपल्या मनोगतात सर्व प्रवाशांना शुभेच्छा दिल्या. एसटी कर्मचारी कोंडे यांनी प्रवाशांकडून एसटी व परिसरात स्वच्छतेसाठी सहकार्याची विनंती केली. किनवट आगारास नांदेड विभागातून प्रथम क्रमांक मिळवून दिल्याबद्दल आगारप्रमुख अशोक चव्हाण यांचे अभिनंदन करण्यात आले. पंधरा वर्षे विनाअपघात सुरक्षित सेवा देणाऱ्या ३१ चालकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. शेवटी केक कापून व पेढे वाटून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रशांत वाठोरे, राज माहुरकर, मलिक चव्हाण, लक्ष्मीकांत मुंडे, शुभम शिंदे, विजय जोशी, संतोष सिसले, वाहतूक अधीक्षक शीलरत्न ढगे, वाहतूक निरीक्षक साईनाथ मुंडे, गंगय्या सटलावार, शंकर ताडेवार, गजेंद्र दासरवार, व एसटीचे चालक, वाहक, प्रशासकीय व यांत्रिक कर्मचारी यांची उपस्थिती होती. संतोष अनंतवार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मानले.

# निवडणूक निरीक्षक डॉ. माधवी खोडे-चवरे नांदेडमध्ये दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६ साठी भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेल्या निवडणूक निरीक्षक डॉ. माधवी खोडे-चवरे (भाप्रसे) यांचे १ जून रोजी नांदेड येथे आगमन झाले. यावेळी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास भेट देऊन निवडणूक विषयक कामकाजाची पाहणी केली.



डॉ. माधवी खोडे-चवरे यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कामकाजाबाबत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्यासह निवडणूक विभागातील अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तसेच विविध निवडणूक कक्षासह, प्राप्त नामनिर्देशन अर्ज व मतदार यादी बाबत माहिती घेतली.

येथील स्नेहनगर शासकीय विश्रामगृहात निवडणूक काळात त्या थांबणार आहेत. नागरिकांना नांदेड विधान परिषदेच्या निवडणुकी संदर्भात असणाऱ्या समस्यांबाबत २ ते ४ जून, १२ ते १४ जून आणि १७ ते २२ जून २०२६ या कालावधीत त्यांच्याशी संपर्क साधला जाऊ शकतो. त्यांचा ई-मेल आयडी observer.mlc.nedgmail.com आहे. त्यांचा संपर्क क्र. ९६३७२२८९५५ आहे.

# मनपा सिडको क्षेत्रीय कार्यालयअंतर्गत मान्सूनपूर्व नाले सफाई करण्याची मागणी

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – मनपा सिडको क्षेत्रीय कार्यालयांतर्गत नाले मान्सूनपूर्व साफसफाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड. प्रसेनजित वाघमारे यांनी मनपा आयुक्त व सहायक आयुक्त सिडको क्षेत्रीय कार्यालय यांच्याकडे केली आहे.

आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले की, काही दिवसात राज्यासह देशात मान्सून सक्रीय होणार आहे. या काळात होणाऱ्या आपत्तीचे निवारण ही मनपा प्रशासनाची जबाबदारी आहे. कुसुमताई शाळेजवळ नाल्याला जोडलेले पाईप अरुंद किंवा छोटे होत असल्याने ते पाणी नाल्यातून सरळ कुसुमताई शाळा परिसरातील लोकांच्या घरामध्ये जावून त्यांचे जीवनमान विस्कळीत होत आहे. मागील तीन वर्षापासून येथील नागरीक बिकट परिस्थितीतून जात आहेत.

पावसाळ्यापूर्वी सिडको भागातील राहूल नगर (गोविंद कॉलनी), दुर्गा माता मंदिर परिसर, के -१ ते के-२, इंदिरा गांधी कॉलेज परिसर, गुरुवार बाजार, शंकर नगर परिसर, स्मशानभूमी समोरील परिसर, संभाजी चौक बेरजे टेन्ट हाऊससमोरील परिसर, जुने वसंतराव नाईक कॉलेज समोरील परिसरातील व इतर भागात पावसाळ्यात होत असलेल्या जनतेच्या समस्येचे निराकरण करावे.

मनपा प्रशासनाने प्रामुख्याने नाले सफाईची कामे पावसाच्या पाण्याचा तातडीने निचरा करणाऱ्या बाबी याकडे जाणीवपूर्वक लक्ष देवून नागरिकांची होत असलेली गैरसोय थांबवावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या मागणीची दखल घेतली नाही तर मनपा प्रशासनाच्या विरोधात दि. ९ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सिडको येथील सहायक मनपा आयुक्त कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ॲड. प्रसेनजित वाघमारे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# श्रीमद् भागवत प्रशिक्षण शिबीर

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील चिन्मय मिशन शाखेच्या वतीने प. पू. स्वामी प्रत्ययानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनात दि. १५ जुलै ते १५ ऑगस्ट या कालावधीत शिका आणि शिकवा या योजने अंतर्गत श्रीमद् भागवत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी शिबिरार्थींना श्रीमद् भागवत संपूर्ण, भजगोविंदम्, आत्मबोध, भक्तिवंदना आणि भगवत गीता अध्याय ३, ६, १२, १५ यावर सखोल मार्गदर्शन लाभणार आहे. तरी इच्छुकांनी अधिक माहितीसाठी चिन्मय आशीर्वाद आश्रम, चिन्मय व्यंकटेश मंदिर, कॅनॉल रोड, वाडी येथे संपर्क साधावा, असे आवाहन अध्यक्ष भीमराव रामीनवार, सचिव अनंत करडखेडकर व कोषाध्यक्ष सुभाष व्यवहारे यांनी केले आहे.

# श्री संत साधू महाराज सेवा समितीच्यावतीने अधिकमासानिमित्त हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –श्री संत साधू महाराज सेवा समिती व श्री संत साधू महाराज पायी दिंडी सोहळा यांच्या वतीने अधिकमासानिमित्त दि. ८ जून ते १५ जून या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

वासवी भवन मंगल कार्यालय, सिडको रोड येथे संपन्न होणाऱ्या या सप्ताहात नित्य पहाटे ५ ते ६ काकडा, सकाळी ९ ते १० श्री विष्णू सहस्रनाम व श्री साधूसुधा पारायण, दुपारी १२ ते १ जगद्गुरू संत तुकाराम महाराज गाथा भजन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ व सायंकाळी ७ ते ९ कीर्तन आदी कार्यक्रम होणार आहेत.

यावेळी सप्ताहात ह.भ.प. भास्कर महाराज कंधारकर, ह.भ.प. भगवान महाराज महालंग्रीकर, ह.भ.प. परमेश्वर महाराज सोमासवाडीकर, ह.भ.प. श्रीधर महाराज कासराळीकर, ह.भ.प. गंगाधर महाराज वसूरकर, ह.भ.प. मंदार महाराज कंधारकर, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कंधारकर यांच्या कीर्तन श्रवणाचा भाविकांना लाभ मिळणार आहे. दि. १५ जून रोजी सकाळी ९ ते ११ वा. ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कंधारकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे. तरी भाविकांनी हरिनाम सप्ताहाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांना अभिवादन



**लोहा (प्रतिनिधी)**– पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांची ३०१ वी जयंती लोहा तालुक्यातील पोलीसवाडी येथील जि. प. प्रा. शाळेत उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्याप्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक रामदास केंद्रे यांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या आदर्श कार्याचा गौरव करताना त्यांच्या न्यायप्रिय, लोककल्याणकारी व दूरदृष्टीपूर्ण राज्यकारभाराचा उल्लेख केला. त्यांनी देशभरातील अनेक मंदिरे, घाट, विहिरी व धर्मशाळांचे बांधकाम करून समाजसेवेचा आदर्श निर्माण केला. महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि समाजहितासाठी केलेले त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे मुख्याध्यापक रामदास केंद्रे यांनी सांगितले.

यावेळी राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या कार्याचा आदर्श समाजाने अंगीकारावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी शाळेचे सहशिक्षक बालाजी आरसुलवाड यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# प्रवाशांनी प्रवासात धूम्रपान टाळावे; रेल्वे प्रशासनाचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– सर्व रेल्वे प्रवासी व रेल्वे वापरकर्त्यांनी रेल्वे गाड्या तसेच रेल्वे परिसरात धूम्रपान करू नये, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातर्फे करण्यात येत आहे. रेल्वे डब्यांमध्ये, स्थानक परिसरात किंवा इतर रेल्वे क्षेत्रात धूम्रपान करणे हे केवळ रेल्वे नियमांचे उल्लंघन नसून प्रवाशांच्या सुरक्षिततेस तसेच रेल्वेच्या कार्यप्रणालीस गंभीर धोका निर्माण करू शकते, असेही रेल्वे प्रशासनाने म्हटले आहे.

रेल्वे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे की, जळत्या सिगारेटचे थोटूक, बीडी, आगपेटीच्या काड्या किंवा इतर ज्वलनशील वस्तू निष्काळजीपणे फेकल्यामुळे रेल्वे डबे, स्थानक परिसर किंवा रेल्वेच्या मालमत्तेत आग लागण्याच्या घटना घडू शकतात. अशा कृत्यांमुळे प्रवासी, रेल्वे कर्मचारी यांचे जीव धोक्यात येऊ शकते. तसेच रेल्वे मालमत्तेचे नुकसान होऊ शकते.

## रेल्वे सुरक्षेला धोका निर्माण केल्यास पाच वर्षांपर्यंत कारावासाची तरतूद

कायदेशीर तरतुदी रेल्वे डब्यांमध्ये व रेल्वे परिसरात धूम्रपान करणे हा रेल्वे अधिनियम, १९८९ अंतर्गत दंडनीय गुन्हा आहे. रेल्वे अधिनियम, १९८९ च्या कलम १६७ नुसार, रेल्वे डब्यात किंवा रेल्वेच्या कोणत्याही भागात धूम्रपान करण्यास मनाई आहे. या तरतुदीचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करून २०० किंवा त्यापेक्षा अधिक दंड आकारला जाऊ शकतो.

याहून अधिक महत्त्वाचे म्हणजे रेल्वे अधिनियम, १९८९ च्या कलम १५३ नुसार, कोणतीही व्यक्ती बेकायदेशीर कृत्य, जाणीवपूर्वक केलेली चूक किंवा निष्काळजीपणामुळे रेल्वेवरील प्रवाशांच्या सुरक्षिततेस धोका निर्माण करत असल्यास किंवा असा धोका निर्माण होण्यास कारणीभूत ठरत असल्यास त्या व्यक्तीस पाच वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा होऊ शकते.

रेल्वे प्रशासन विशेषतः अधोरेखित करते की, जळते सिगारेटचे थोटूक, बीडी किंवा आगपेटीच्या काड्या रेल्वे डब्यात अथवा रेल्वे परिसरात फेकल्यास आग लागण्याचा धोका निर्माण होऊ शकतो आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका पोहोचू शकतो. अशा निष्काळजी कृत्यांवर कलम १५३ अंतर्गत कठोर कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते.

नांदेड विभागातील रेल्वे सुरक्षा बल व तिकीट तपासणी कर्मचारी रेल्वे गाड्या व रेल्वे परिसरात धूम्रपानविरोधी नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध नियमित तपासण्या, अचानक तपासणी मोहीम, जनजागृती कार्यक्रम व विशेष अंमलबजावणी मोहीम राबवत आहेत. या मोहिमेअंतर्गत मागील दोन महिन्यांत पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे :

एप्रिल-२०२६ धूम्रपानाची ५२ प्रकरणे आढळून आली असून, १० हजार दंड वसूल करण्यात आला. मे-२०२६ धूम्रपानाची २९९ प्रकरणे आढळून आली असून, ५८ हजार १०० रुपये दंड वसूल करण्यात आला. अशा प्रकारे एप्रिल व मे २०२६ या दोन महिन्यांत एकूण ३५१ धूम्रपानाशी संबंधित प्रकरणे नोंदविण्यात आली असून ६८ हजार १०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

याशिवाय रेल्वे सुरक्षा बल/नांदेड यांनी एप्रिल २०२६ मध्ये ४ व मे २०२६ मध्ये ४ अशी एकूण ८ प्रकरणे रेल्वे अधिनियम, १९८९ च्या कलम १५३ अंतर्गत नोंदविली आहेत, ज्यातून प्रवाशांच्या सुरक्षिततेस बाधा आणणाऱ्या कृत्यांविरुद्ध रेल्वे प्रशासनाची कटिबद्धता अधोरेखित होते.

# हभप गोपाळ महाराज पंढरपूरकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –श्री साई संस्थान व गौशाळा कौठा नांदेड येथे अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद भागवत कथा उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी हभप गोपाळ महाराज पंढरपूरकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता झाली.

सोमवार, दिनांक २५ व २६ ते सोमवार दि. १ जून २६ पर्यंत सकाळी काकडा आरती, श्री साईबाबा अभिषेक, सकाळी श्री साई चरित्र पारायण, सकाळी गाथा भजन, दुपारी श्रीमद भागवत कथा, सायंकाळी हरिपाठ, सायंकाळी हरी कीर्तन आदी धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले.

अखंड हरिनाम सप्ताहमध्ये ह.भ.प. प्रवीण महाराज पार्डीकर यांनी संगीतमय भागवत कथा भक्तांना सांगितली व श्रोत्यांनी अगदी भक्तीभावाने व शांतपणे ऐकून आनंद घेतला. कथेतील प्रसंगानुरूप झाक्या देखील करण्यात आल्या होत्या. यामध्ये श्रीकृष्ण, रुक्मिणी, सुदामा, द्वारपाल असे विविध प्रतिरुप तयार करण्यात आले होते. त्यासाठी दिलीप पारडीकर यांनी सहकार्य केले. तसेच कथेला संगीतमय साथ गोटू महाराज,




योगेश मोरे, दत्ता महाराज, विकास महाराज व नवनाथ महाराज यांनी दिली.

श्री साई चरित्र पारायणासाठी प्रदीप फटाले, माधवराव खराणे, सौ. निर्मला खराणे, उद्धवराव खराने यांचे सहकार्य लाभले. संपूर्ण ७ दिवसांसाठी हरिपाठ व कीर्तनासाठी भजनी मंडळ साथ संत भगवान बाबा अध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्था, माहूर यांची लाभली. या सप्ताहात हभप श्रीराम महाराज पांगरेकर यांचे अनमोल सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

या सप्ताहात हभप निखिल महाराज चक्रवार, हभप पंढरीनाथ महाराज मुरकुटे, हभप विश्वनाथ महाराज हिब्बटकर, हभप महेश महाराज शेवाळकर, हभप बालाजी महाराज गुडेवार, हभप श्रीराम महाराज पांगरेकर, हभप राम महाराज ठाकूर बुवा पंढरपूरकर यांनी सेवा देऊन भक्तांना जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या अभंगातून बौद्धिक ज्ञानाची उदाहरण व प्रमाण देऊन भर पाडली.

सप्ताहाची सांगता हभप गोपाळ महाराज ठाकूर बुवा पंढरपूरकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. या सप्ताहात संस्थानचे पूजारी दीपक पाठक, प्रदीप फटाले, दिलीप जोशी, राजू परमार, बजरंग भगत, श्रीमती ममता गवळी, हितेश व सहकारी यांचे सहकार्य लाभले. या धार्मिक कार्यक्रमासाठी संस्थानचे अध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, उपाध्यक्ष प्रल्हाद गव्हाणे, सचिव श्रीराज चक्रवार, कोषाध्यक्ष जगन्नाथ चक्रवार, विश्वस्त मधुकर मुक्कावार, गोविंद सुंकेवार, कुणाल कंदकुर्ते, बिजुसेठ जिल्हा, देवराव काळे, कन्हैयालाल गहेलोत, संजय नळदकर, डॉ. सुनिल मुंदडा, गणेश गादेवार यांनी सप्ताहाचे नियोजन केले.

# 'यशवंत' हैदराबाद येथे राष्ट्रस्तरीय प्लॅटिनम पारितोषिकाने सन्मानित

**नांदेड (प्रतिनिधी)** –यशवंत महाविद्यालयास राष्ट्रीय स्तरावरील भारत एन्व्हॉर्मेन्ट प्रोग्राम: भारत सस्टेनेबल कॅम्पस मिशन-२०२६ अंतर्गत यशस्वी उपक्रमाबद्दल सन्मानीत करण्यात आले. प्लॅटिनम सस्टेनेबल कॅम्पस पारितोषिक ग्लोबल पीस ऑडिटोरियम हैदराबाद येथे माजी प्र-कुलगुरु प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले.

या सोहळ्यास २६ घटक राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशातील जवळपास एक हजारपेक्षा जास्त सदस्यांचा सहभाग होता. यावेळी शासकीय पदाधिकारी, शिक्षणतज्ज्ञ, कुलगुरू, डीआर-डीओ, एआयसीटीई, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि अशासकीय संघटनेतील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले.




यशवंत महाविद्यालयाने पर्यावरण संवर्धन, झिरो प्लास्टिक, ग्रीन कॅम्पस मिशन अशा एकूण आठ उपक्रमांत रिसर्च हाइट्स फाउंडेशनच्या सहकार्याने १६८ विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण आणि यशस्वी कृतिशील उपक्रमांनी सहभाग नोंदविला होता. या उपक्रमात भारतातील जवळपास प्रत्येक घटक राज्यातील उच्च शिक्षण संस्थांनी सहभाग घेतला होता.

प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. एल. व्ही. पदमाराणी राव यांच्या समन्वयाखाली हरित कॅम्प पार पडला. यावेळी यशवंत महाविद्यालय ते भाग्यनगर समुदाय जनजागरण रॅली आणि भाग्यनगर परिसरात विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

तसेच बाबानगर परिसरात झिरो प्लास्टिक ड्राईव्ह अंतर्गत शासकीय रुग्णालयात स्वच्छता अभियान राबवण्यात आले. कॅम्पस ग्रीन ॲक्शनअंतर्गत बोटॅनिकल गार्डनमध्ये वृक्षारोपणाबरोबरच कचरा व्यवस्थापन आणि जल पुनर्वापरावर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांचे पोस्टर सादरीकरण, महाविद्यालयाचे ग्रीन ऑडिट, सस्टेनेबल आयडिया अँड सोल्युशन सत्रामध्ये विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पना नोंदविण्यात आल्या.


'यशवंत'च्या शिरपेचात राष्ट्रस्तरीय पारितोषिकाचा तुरा खोवल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व संस्थेचे अध्यक्ष खा. अशोकराव चव्हाण, उपाध्यक्ष माजी आमदार सौ. अमितासाई चव्हाण, सचिव माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, सहसचिव डॉ.रावसाहेब शेंदारकर, कोषाध्यक्ष ॲड. उदयराव निंबाळकर, कार्यकारिणी सदस्य ॲड. आ. कु. श्रीजयाताई चव्हाण, नरेंद्र चव्हाण, पांडुरंगराव पावडे यांनी अभिनंदन केले आहे.

पुरस्कार वितरण सोहळ्यास डॉ. कैलास इंगोले, प्रा. प्रियंका शिसोदिया यांच्यासमवेत ईश्वर पासवाड, आर्मीश सर्वारी, चक्रधर देशमुख, पार्थ कोरके, भावेश गोहिल, समीक्षा जैन, वैष्णवी पाटील, झार्मीन इफ्राह, निखिल सोनकांबळे, कोमल कागदेवाड या विद्यार्थ्यांची आणि शिक्षकेतर कर्मचारी माधव डाखोरे यांची उपस्थिती होती.

उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. राजरत्न सोनटक्के, डॉ. रमेश चिल्लावार, डॉ. संतोष राऊत, डॉ. बी. बालाजीराव, डॉ. एम. एम. व्ही. बेग, डॉ. मदन अंभोरे, प्रा. श्रीकांत सोमठाणकर, प्रा. अभिनंदन इंगोले, डॉ. कांचन गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी



# कोरड्या त्वचेला मॉइश्चरायझर लावणे मोठी चूक!

**प्रत्येकाला सुंदर, चमकदार आणि तरुण त्वचा हवी असते. हे मिळवण्यासाठी, आपण महागड्या फेस वॉशपासून ते विविध क्रीम्स आणि सीरम्सपर्यंत सर्व काही वापरतो. पण तुम्हाला माहित आहे का की आंघोळीनंतर किंवा चेहरा धुतल्यानंतर तुम्ही तुमचे क्रीम किंवा मॉइश्चरायझर कसे लावता यावर तुमच्या चेहऱ्याची चमक अवलंबून असते? बरेचदा, आंघोळीनंतर आपण टॉवेलने आपला चेहरा पूर्णपणे कोरडा करतो आणि नंतर मॉइश्चरायझर लावतो. जर तुम्हीही असेच करत असाल, तर आताच थांबा, कारण ही छोटी सवय तुमच्या त्वचेला अकाली वृद्ध होण्यास कारणीभूत ठरू शकते.**

## अकाली सुरकुत्या येऊ शकतात...

### यामागील विज्ञान काय आहे?

आजकाल बहुतेक मॉइश्चरायझर्समध्ये ग्लिसरीन किंवा हायल्यूरॉनिक ॲसिडसारखे घटक असतात. यांना 'ह्युमेक्टंट्स' (humectants) म्हणतात. स्पंजप्रमाणे पाणी शोषून घेऊन त्वचेला टवटवीत आणि तरुण ठेवणे हे त्यांचे काम आहे. तथापि, जर तुम्ही ते पूर्णपणे कोरड्या त्वचेवर लावले, तर पृष्ठभागावरील पाण्याच्या कमतरतेमुळे हे घटक तुमच्या त्वचेच्या खोल थरांमधून पाणी खेचतात. यामुळे तुमची त्वचा आतून आणखी कोरडी होते. दीर्घकाळ असे केल्याने सुरकुत्या आणि बारीक रेषा लवकर दिसू शकतात, ज्यामुळे तुम्ही तुमच्या वयापेक्षा जास्त वयस्कर दिसू शकता.

मॉइश्चरायझरचे मुख्य कार्य तुमच्या त्वचेत ओलावा निर्माण करणे हे नाही, तर ओलावा 'बंदिस्त' करणे, म्हणजेच त्याचे बाष्पीभवन होण्यापासून रोखणे हे आहे. जेव्हा तुम्ही टॉवेलने तुमचा चेहरा पूर्णपणे कोरडा करता, तेव्हा त्वचेच्या वरच्या पृष्ठभागावर पाण्याचा एकही थेंब शिल्लक राहत नाही. त्यामुळे, जेव्हा तुम्ही कोरड्या चेहऱ्यावर मॉइश्चरायझर लावता, तेव्हा त्यात बंदिस्त करण्यासाठी ओलावाच नसतो. परिणामी, क्रीम तुमच्या त्वचेवर फक्त एक थर तयार करते आणि खोलवर प्रवेश करू शकत नाही, ज्यामुळे तुमची त्वचा कोरडी आणि निर्जीव दिसते.

## मॉइश्चरायझर लावण्याची योग्य पद्धत कोणती?

- त्वचेचे तज्ञ नेहमी ओलसर त्वचेवर किंवा किंचित ओलसर चेहऱ्यावर मॉइश्चरायझर लावण्याची शिफारस करतात. याला '३-मिनिटांचा नियम' असेही म्हणतात.
- चेहरा चोळू नका : आंघोळीनंतर किंवा चेहरा धुतल्यानंतर, टॉवेलने चेहरा चोळू नका. फक्त हलकेच टॅप करून कोरडा करा.
- तो किंचित ओलसर ठेवा : तुमचा चेहरा किंचित ओलसर असावा. तुमच्या त्वचेतून पाणी टपकता कामा नये. पण ती स्पर्शाला फक्त किंचित ओलसर वाटली पाहिजे.
- त्वरेने क्रीम लावा : चेहरा धुतल्यानंतर २ ते ३ मिनिटांच्या आत मॉइश्चरायझर लावा.
- ओलावा टिकवून ठेवा : किंचित ओलसर चेहऱ्यावर मॉइश्चरायझर लावल्याने क्रीमला पाणी शोषून घेण्यास आणि त्वचेतील ओलावा टिकवून ठेवण्यास मदत होते.
- लक्षात ठेवा : जर तुम्ही आजपासून कोरड्या चेहऱ्याऐवजी किंचित ओलसर चेहऱ्यावर मॉइश्चरायझर लावायला सुरुवात केली, तर तुम्हाला काही दिवसांतच तुमच्या त्वचेत एक जादुई बदल दिसून येईल. तुमची त्वचा अधिक चमकदार, आर्द्र आणि तरुण दिसेल.

## घामामुळे केस चिकट अन् दुर्गंधीयुक्त?

### स्वयंपाकघरातील 'या' गोष्टीची कमाल अनुभवा...

तीव्र सूर्यप्रकाश, आर्द्रता आणि घामामुळे टाळू चिकट होणे ही एक सामान्य गोष्ट आहे. कधीकधी परिस्थिती इतकी बिघडते की शॅम्पू लावल्यानंतर दुसऱ्याच दिवशी केस पुन्हा तेलकट दिसू लागतात आणि घामातून विचित्र वास येऊ लागतो. जर तुमचे केस चिकट आणि दुर्गंधीयुक्त होत असतील आणि तुम्ही एक दिवसाआड शॅम्पू करून थकला असाल, तर तुमच्या स्वयंपाकघरातच एक असा जादुई घटक आहे जो तुमचे केस अनेक आठवडे ताजे, चमकदार आणि सुगंधित ठेवू शकतो. तो घटक म्हणजे ॲपल सायडर व्हिनेगर. चला तर मग, ते तुमच्या केसांसाठी कसे वरदान ठरू शकते आणि त्याचा वापर कसा करायचा हे जाणून घेऊया...




### योग्य वापर

ॲपल सायडर व्हिनेगर कधीही थेट केसांवर वापरू नये, कारण ते खूप तीव्र असते. ते नेहमी पाण्यात मिसळूनच वापरा. जसे, की १ ते २ चमचे ॲपल सायडर व्हिनेगर, १ मग कोमट पाणी घ्या. सर्वप्रथम, कोणतीही घाण काढून टाकण्यासाठी आपले केस आणि टाळू आपल्या नेहमीच्या सौम्य शाम्पूने पूर्णपणे धुवा. आता, एका मग कोमट पाण्यात १ किंवा २ चमचे ॲपल सायडर व्हिनेगर मिसळा. पाणी खूप गरम नाही याची खात्री करा; ते कोमट असावे. शॅम्पू लावल्यानंतर, हे मिश्रण हळूवारपणे तुमच्या केसांवर आणि टाळूवर लावा. तुमच्या बोटांनी १-२ मिनिटे टाळूला हळूवारपणे मालिश करा. हे मिश्रण केसांवर २ ते ३ मिनिटे तसेच राहू द्या. त्यानंतर, साध्या किंवा थंड पाण्याने केस पुन्हा पूर्णपणे धुवा. यामुळे तुमचे केस चिकट होण्यापासून वाचतील आणि त्यांचा ताजेपणा टिकून राहील.

# सर्व काही असूनही मजबुरी!

## सुशिक्षित अन् स्वावलंबी महिलासुद्धा खराब नातेसंबंधातून का सुटू शकत नाहीत?



**आज महिला प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने प्रगती करत आहेत. घर सांभाळण्यासोबतच, त्या आपल्या करिअरलाही प्राधान्य देत आहेत आणि स्वावलंबी बनत आहेत. तथापि, स्वावलंबी आणि सुशिक्षित असूनही, अनेक महिला खराब संसारातून, नातेसंबंधातून बाहेर पडू शकत नाहीत. लोकांना अनेकदा वाटते की शिक्षण आणि पैशामुळे निर्णय घेणे सोपे होते, पण वास्तव याच्या खूप दूर आहे. खरे तर, महिलांना कठीण लग्नांमध्ये जखडून ठेवणारे बंध आर्थिक नसून सामाजिक, मानसिक आणि कौटुंबिक आहेत. ज्येष्ठ मानसशास्त्रज्ञ डॉ. मोनिका शर्मा यांच्याकडून जाणून घेऊया की स्वावलंबी महिलांनाही खराब संसाराच्या बंधनातून सुटणे का कठीण जाते...**

### कौटुंबिक दबाव आणि तडजोडीचा काळ

एखाद्या संकटात सापडलेल्या स्त्रीसाठी मदत करण्याऐवजी तिचे स्वतःचे कुटुंबच अनेकदा तडजोडीचे सल्ले देते. या काळात तिला विविध दबावांना सामोरे जावे लागते. तिच्या आनंदापेक्षा कुटुंबाच्या प्रतिष्ठेला अधिक महत्त्व दिले जाते. लोक काय म्हणतील याची भीती स्त्रीच्या मनात तिच्या कुटुंबातील सदस्यांकडून रुजवली जाते. 'आम्ही तुझ्यासाठी इतकं सगळं केलं, आणि तू आमच्यासोबत असं वागशील?' असं म्हटल्याने स्त्रियांच्या मनात अपराधीपणाची भावना निर्माण होते. जर स्त्रीला मुले असतील, तर हा अपराधीपणाचा भार अधिकच वाढतो. मुलांच्या भल्यासाठी त्याच कठीण नात्यात राहण्यास स्त्रीला भाग पाडले जाते आणि ते सहन करण्यास सांगितले जाते. कधीकधी, तिचे माहेरदेखील तिच्यासाठी सुरक्षित पर्याय राहत नाही.

### सामाजिक कलंक

आपल्या समाजात, घटस्फोटाकडे आजही एक मोठा कलंक म्हणून पाहिले जाते, विशेषतः स्त्रियांसाठी. समाजाची ही वृत्ती स्त्रियांचे मनोधैर्य खच्ची करते. घटस्फोटाला नेहमीच एक अपयश मानले जाते आणि या अपयशाचा संपूर्ण दोष केवळ स्त्रीवर टाकला जातो. समाज नेहमीच पहिला दोष स्त्रीवर टाकतो, कारण त्याला वाटते की तिच्यातच काहीतरी चूक असली पाहिजे. जर मुले असतील, तर समाजाचा दृष्टिकोन आणखी कठोर होतो. शिवाय, घटस्फोटित स्त्रीला पुन्हा चांगले नातेसंबंध मिळवणे अत्यंत कठीण मानले जाते. काही ठिकाणी, कामाच्या ठिकाणीही घटस्फोटित स्त्रियांकडे नकारात्मक दृष्टीने पाहिले जाते.

### कायदेशीर गुंतागुंत

- स्त्री कमावत असली तरी, बहुतेक प्रकरणांमध्ये मालमत्ता, संपत्ती आणि बचतीवर पती किंवा वडिलांचाच हक्क असतो. अनेक स्त्रियांना हे माहीत नसते की त्या कायदेशीररित्या पोटगी किंवा मालमत्तेच्या हक्कांसाठी पात्र आहेत. कायदेशीर लढाईची भीतीही असते.
- न्यायालयातील खटले वर्षानुवर्षे चालतात, ज्यामुळे स्त्रीची ऊर्जा आणि पैसा दोन्ही खर्च होतो. या भीतीमुळे स्त्रिया घटस्फोट घेण्यास कचरतात. इतकेच नाही, तर अनेक प्रकरणांमध्ये सासरचे लोक त्यांची मुले काढून घेण्याची धमकी देतात. यामुळेही स्त्रिया घटस्फोट घेण्यापासून परावृत्त होतात.

### मानसिक गोंधळ, एकटेपणाची भीती

सततच्या तणावामुळे स्त्रिया अनेक बंधनांनी मानसिकरित्या जखडल्या जातात. परिस्थिती सामान्य आहे असे समजून, कदाचित प्रत्येक घरात असेच घडते, असा विचार करून त्या सर्व काही मुकाट्याने सहन करण्यास भाग पडतात. इतकेच नाही तर, स्त्रियांना प्रश्न पडू लागतो, 'माझ्या आयुष्याची इतकी वर्षे या नात्याला समर्पित केल्यानंतर मी हे नाते कसे सोडू?' कुटुंब आणि सासरच्या मंडळींकडून वारंवार होणाऱ्या टीकेमुळे स्त्रीचा स्वतःच्या विचारांवर आणि निर्णयांवरचा आत्मविश्वास कमी होऊ शकतो. शिवाय, खोलवर रुजलेले भावनिक बंधन कठीण नात्यातही भावनिक संबंध टिकवून ठेवते. एकटेपणाची भीती अनेकदा स्त्रियांना परावृत्त करते. लग्न कितीही कठीण आणि वेदनादायी असले तरी, एकटे राहण्याचा विचार खूप भीतीदायक असतो.



### या बेड्या कशा तोडायच्या?

- स्वतःला मान्यता द्या : सर्वप्रथम, हे स्वीकारा की तुमची वेदना योग्य आणि खरी आहे. तुम्ही अतिप्रतिक्रिया देत नाही आहात.
- स्वतःला आर्थिकदृष्ट्या सुरक्षित करा : तुमचे बँक खाते, बचत आणि सर्व महत्त्वाची कागदपत्रे नेहमी सुरक्षित ठेवा.
- कायदेशीर बाबींबद्दल जागरूक रहा : आपले हक्क समजून घेण्यासाठी महिलांच्या हेल्पलाइनशी संपर्क साधा.
- थेरपी आणि समाजाकडून मदत घ्या : थेरपिस्ट तुमचे निर्णय घेत नाही, तर तुम्हाला विचार करण्यास मदत करतो. तसेच, ऑनलाइन सपोर्ट ग्रुप्समध्ये सामील व्हा, जिथे लोक त्यांच्या खऱ्या कथा सांगतात आणि तुम्हाला मदत करू शकतात.
- शांतपणे योजना बनवा : सर्व काही एका रात्रीत बदलत नाही, म्हणून शांतपणे बाहेर पडण्याची योजना तयार करा.

# तुमचे सनस्क्रीन पूर्णपणे सुरक्षित आहे का?

## खरेदी करण्यापूर्वी या महत्त्वाच्या गोष्टी तपासा...

**तीव्र सूर्यप्रकाशामुळे उन्हाळ्यात त्वचा टॅन होणे ही एक सामान्य समस्या आहे. ते टाळण्यासाठी सनस्क्रीन हा सर्वोत्तम मार्ग आहे. ते केवळ टॅनिंग टाळत नाही, तर त्वचेचे अतिनील किरणांपासून संरक्षणही करते. त्यामुळे, सनस्क्रीन लावणे खूप महत्त्वाचे आहे, पण तुम्ही वापरत असलेले सनस्क्रीन खरोखरच सुरक्षित आहे का?**

एका अमेरिकन अहवालानुसार, अमेरिकेत विकल्या जाणाऱ्या सुमारे ८०% सनस्क्रीन सुरक्षा मानकांची पूर्तता करत नाहीत. या अहवालात २,७८४ सनस्क्रीनची बारकाईने तपासणी करण्यात आली आणि त्यात केवळ ५०० उत्पादने सुरक्षित आणि प्रभावी असल्याचे आढळले. याचा अर्थ असा की केवळ २०% सनस्क्रीन सुरक्षिततेच्या मानकांची पूर्तता करतात. त्यामुळे, तुमचे सनस्क्रीन सुरक्षित आहे की नाही हे जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.



## कंपन्यांचे अतिरंजित दावे...

या तपासात असे उघड झाले आहे की अनेक कंपन्या त्यांच्या उत्पादनांवरील SPF घटकाबद्दल अतिशयोक्ती करतात, परंतु प्रत्यक्षात हे सनस्क्रीन नमूद केलेल्या SPF च्या केवळ एक-चतुर्थांश UVA आणि ५९% UVB संरक्षण देतात. इतकेच नाही, तर अहवालात हे देखील स्पष्टपणे दिसून येते की, ९९% संरक्षणाचा दावा करणाऱ्या महागड्या SPF 100+ आणि ९८% संरक्षण देणाऱ्या बजेट-अनुकूल SPF 50+ च्या परिणामकारकतेमध्ये कोणताही लक्षणीय फरक नाही.

## केमिकल की मिनरल : कोणते सनस्क्रीन चांगले?

**बाजारात दोन मुख्य प्रकारचे सनस्क्रीन उपलब्ध आहेत आणि ते समजून घेणे तुमच्यासाठी महत्त्वाचे आहे :**

- मिनरल ऑक्साइड सनस्क्रीन : या प्रकारच्या सनस्क्रीनमध्ये झिंक आणि टायटॅनियम डायऑक्साइडसारखी आवश्यक खनिजे असतात. ही त्वचेवर एक संरक्षक थर तयार करतात आणि तेथून सूर्याची किरणे परावर्तित करतात. तज्ञांच्या मते, या प्रकारचे सनस्क्रीन त्वचेसाठी पूर्णपणे सुरक्षित आहेत.
- केमिकल सनस्क्रीन : हे सनस्क्रीन त्वचेच्या पृष्ठभागावर न राहता त्वचेत शोषले जातात. ते स्पंजप्रमाणे काम करतात, हानिकारक अतिनील किरणे शोषून घेतात.

## केवळ सनस्क्रीनवर अवलंबून राहू नका...

**अमेरिकन ॲकॅडमी ऑफ डर्मेटोलॉजीनुसार, तुमच्या त्वचेचे सूर्यापासून संरक्षण करण्यासाठी फक्त सनस्क्रीन लावणे पुरेसे नाही. तुम्हाला इतर काही महत्त्वाच्या सवयी देखील अंगीकारण्याची गरज आहे...**




- सूर्यप्रकाशात जाण्यापूर्वी १५ मिनिटे आधी सनस्क्रीन लावा.
- जर तुम्ही जास्त वेळ उन्हात असाल, तर दर दोन तासांनी सनस्क्रीन पुन्हा लावा.
- प्रवासात असताना पूर्ण बाह्यांचे कपडे, सनग्लासेस आणि रुंद कडा असलेली टोपी घाला.
- सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत थेट सूर्यप्रकाश टाळण्याचा प्रयत्न करा.

### भारतीय मानके कशी ओळखावी?

जर तुम्ही सनस्क्रीन खरेदी करत असाल, तर त्याची सुरक्षितता आणि शुद्धता तपासणे खूप सोपे आहे. खरेदी करण्यापूर्वी नेहमी उत्पादनाचे लेबल काळजीपूर्वक तपासा. भारतीय सुरक्षा मानकांनुसार, केवळ तेच सनस्क्रीन वापरा ज्यावर ISO 24444 किंवा ISO 2442 लिहिलेले असेल.



# १७ पैकी ४ मतदारसंघात 'मविआ' निवडणुकीआधीच स्पर्धेबाहेर

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १७ जागांसाठी जाहीर झालेल्या विधान परिषद निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी (मविआ) असा सामना रंगणार असे चित्र असतानाच, मतदानापूर्वीच 'मविआ'ला धक्का बसला आहे. १७ पैकी ४ महत्त्वाच्या मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार तांत्रिक त्रुटी आणि राजकीय माघारीमुळे निवडणुकीच्या मुख्य प्रक्रियेतून बाहेर पडले आहेत. सोलापूरमध्ये काँग्रेस उमेदवाराचा अर्ज बाद झाला, यवतमाळमध्ये संख्याबळ नसल्याने 'मविआ'च्या उमेदवाराने स्वतःहून माघार घेतली, तर नाशिकमध्ये उबाठा गटाने उमेदवारच न दिल्याने त्यांनी एका




प्रकारे शरणागती पत्करल्याचे समोर आले आहे. परिणामी, मतदानापूर्वीच महायुतीचे पारडे जड झाले असून, त्यांच्या उमेदवारांचा विजयाचा मार्ग सुकर झाला आहे.

सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात महायुतीने भाजपचे राजेंद्र राऊत यांना मैदानात उतरवले आहे, तर महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे आदित्य फत्तेपूरकर उमेदवारी अर्ज दाखल करून लढतीत होते. मात्र, अर्ज छाननी प्रक्रियेदरम्यान तांत्रिक कारणांमुळे फत्तेपूरकर यांचा अर्ज बाद ठरवण्यात आला. यामुळे मुख्य लढतीपूर्वीच महाविकास आघाडीचा अधिकृत उमेदवार रिंगणातून बाद झाला आहे. सोलापुरात एकूण ६१४ मतदार असून, त्यापैकी भाजप महायुतीकडे ४२८ आमदारांचे भक्कम संख्याबळ आहे, तर मविआकडे केवळ ८१ मते आहेत. अशावेळी विरोधी उमेदवाराचा अर्ज बाद झाल्यामुळे राजेंद्र राऊत यांच्या विजयाची औपचारिक घोषणा बाकी आहे.यवतमाळ मतदारसंघात महाविकास आघाडीला सर्वात मोठा धक्का बसला आहे. येथील मविआचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. निवडणूक जिंकण्यासाठी आवश्यक असणारे मतदारांचे संख्याबळ आमच्याकडे जुळत नसल्यामुळे मी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेत आहे, अशी उघड कबुली कांबळे यांनी अर्ज मागे घेतल्यानंतर दिली. काँग्रेसने उमेदवारी दिल्याबद्दल त्यांनी पक्षाचे आभार मानले. यवतमाळमधील एकूण ४४६ मतदारांपैकी महाविकास आघाडीकडे केवळ १३१ मतदार होते, तर उर्वरित संख्याबळ महायुतीच्या बाजूने असल्याने मविआने मतदानापूर्वीच येथे शस्त्रे खाली टाकली आहेत.अमरावतीत भाजपने माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे पाटील यांना उमेदवारी दिली असून, त्यांचा अर्ज भरताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे स्वतः उपस्थित होते. मात्र, शिवसेनेचे माजी आमदार विप्लव बजोरिया यांनी बंडखोरी करत अपक्ष अर्ज भरल्यामुळे पोटे यांच्यासमोर डोकेदुखी निर्माण झाली होती. बुधवारी झालेल्या छाननी प्रक्रियेत बजोरिया यांचा अर्ज बाद करण्यात आला. विशेष म्हणजे, महाविकास आघाडीचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांनीच बजोरिया यांच्या अर्जावर आक्षेप घेतला होता, जो जिल्हाधिकाऱ्यांनी ग्राह्य धरला. ४४९ पैकी २२२ चे संख्याबळ असलेल्या पोटे पाटील यांचा मार्ग या निर्णयामुळे सुकर झाला असला, तरी अर्ज बाद झाल्यामुळे विप्लव बजोरिया यांनी आता न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत.

# संत तुकोबांच्या वारीचं वेळापत्रक जाहीर; पालखी ७ जुलैला पंढरीकडे प्रस्थान

**पुणे (प्रतिनिधी)** – मान्सूनच्या पहिल्या पावसानंतर वारकरी भक्तांना वेध लागते ते पंढरीच्या पांडुरंगाचे, पंढरीच्या वारीची उत्सुकता आणि विठ्ठल भेटीच्या ओढीने वारकरी आषाढी एकादशीची वाट पाहतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणारे लाखो वारकरी, हजारो दिंड्या आणि संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालख्यांसह राज्यातील अनेक जिल्ह्यातून येणाऱ्या मानाच्या पालख्या आपल्या वारीचं नियोजन करत असतात. पाऊले चालती पंढरीची वाट.. म्हणत विठ्ठल नामाचा गजर करत या पालख्यांसह हजारो वारकरी पंढरीकडे चालतात. यंदा आषाढी एकादशी २५ जुलै २०२६ रोजी होत असल्याने आत्तापासूनच पंढरीच्या वारीचं नियोजन केलं जात आहे. त्यातच, संत तुकोबांच्या वारीचं वेळापत्रक जाहीर झालं असून यंदा ७ जुलैपासून तुकोबांची पालखी पंढरीकडे प्रस्थान करणार आहे.

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या ३४१ व्या आषाढी पायी वारी पालखी सोहळ्याची तयारी आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. जेष्ठ वद्य सप्तमी, मंगळवार ७ जुलै २०२६ रोजी श्रीक्षेत्र देहू येथील मुख्य देऊळवाड्यातून संत तुकाराम महाराजांची पालखी भक्ती, श्रद्धा आणि नामस्मरणाचा गजर करत पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. यंदाच्या



पालखी सोहळ्यासाठी ह.भ.प. विक्रमसिंह उमराज मोरे, ह.भ.प. उमेश सुरेश मोरे आणि ह.भ.प. लक्ष्मण दत्तात्रय मोरे यांची पालखी सोहळा प्रमुख म्हणून निवड करण्यात आली आहे. तसेच पालखी रथ आणि चौघडा गाडीसाठी संस्थानतर्फे तीन बैलजोड्या खरेदी करण्यात आल्या असून त्या यंदाच्या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. तुकोबारायांच्या पालखीसह संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचीही उत्सुकता वारकरी आणि विठ्ठलभक्तांना असते. त्यामुळे, आता संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे आळंदीतून पंढरीकडे कधी प्रस्थान होणार हेही लवकरच समजणार आहे.

दरम्यान, पंढरीच्या वारीसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो दिंड्या आणि शेकडो पालख्या येत असतात. त्यामध्ये, जळगावमधून संत मुक्ताई, बुलढाण्यातून संत गजानन महाराजांच्या पालखीचेही प्रस्थान होत असते. गजानन महाराजांची पालखी शेगाव ते पंढरी वारकऱ्यांसह पायी प्रवास करते.

# प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात 'मराठा आरक्षण कक्ष' स्थापन करणार

**मुंबई (प्रतिनिधी)** – मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर राज्य सरकारकडून युद्धपातळीवर हालचाली सुरू असून, आरक्षणासंदर्भातील नोंदी शोधणे, कुणबी जात प्रमाणपत्र आणि जात पडताळणी प्रमाणपत्र मिळवण्यात नागरिकांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष 'मराठा आरक्षण कक्ष' स्थापन करण्यात येणार आहे. नागरिकांना तातडीने सहाय्य करण्यासाठी जिल्हा पातळीवर विशेष हेल्पलाईन क्रमांक सुरू केले जाणार आहेत; तसेच मंत्रालयातील कार्यालयातही '९३२६५६२८१५' हा मुख्य हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आला असून कार्यालयीन वेळेत यावर संपर्क साधता येईल, अशी माहिती जलसंपदा मंत्री आणि मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी बुधवारी दिली. दरम्यान, कुणबी नोंदी शोधण्यासाठी गठीत केलेल्या न्यायमूर्ती शिंदे समितीला ३० जून २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही मंत्रिमंडळ उपसमितीने



घेतला आहे.मंत्रालयात मंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मराठा आरक्षण उपसमितीची उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांच्यासह विविध विभागांचे प्रधान सचिव आणि विभागीय आयुक्त उपस्थित होते.

बैठकीत विखे-पाटील यांनी स्पष्ट केले की, न्यायमूर्ती शिंदे समितीच्या स्थापनेनंतर राज्यात आतापर्यंत १३ लाख कुणबी दाखल्यांचे वितरण झाले आहे. यापूर्वी आणि आता झालेल्या दाखल्यांच्या वाटपाची संपूर्ण माहिती जिल्हा व तालुका स्तरावर तातडीने संकलित करावी. पुढील तीन महिन्यांमध्ये छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्तांनी तयार केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार विशेष शिबिरे आणि गृहभेटी आयोजित करून दाखले वितरणाची गती वाढवावी, अशी जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर निश्चित करण्यात आली असून याचा आढावा दर आठवड्याला घेतला जाणार आहे. जात पडताळणी प्रमाणपत्र वितरणाचा आढावा दर १५ दिवसांनी विभागीय आयुक्तांनी घ्यावा, असेही निर्देश देण्यात आले.

# मुंबई इंडियन्सने आयपीएलचे पूर्ण पैसे दिले नाहीत, स्टार खेळाडूच्या आरोपानंतर खळबळ

**मुंबई (प्रतिनिधी)** – आयपीएल २०२६ चा थरारक हंगाम नुकताच संपला असून ३१ मे रोजी या हंगामाचा महाअंतिम सामना खेळवला गेला. मात्र, हा हंगाम संपून अवघे तीन दिवस उलटत नाही तोच क्रिकेट जगतातून एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक बातमी समोर आली आहे. आयपीएलमधील सर्वात यशस्वी आणि श्रीमंत फ्रेंचायझीपैकी एक असलेल्या 'मुंबई इंडियन्स'वर एका स्टार परदेशी खेळाडूने मानधनाचे पूर्ण पैसे न दिल्याचा गंभीर आरोप केला आहे. हा खेळाडू दुसरा कोणी नसून न्यूझीलंडचा ऑलराउंडर मिचेल सँटनर आहे.

मिचेल सँटनर हा आयपीएल २०२६ च्या हंगामात दुखापतीमुळे मुंबई इंडियन्ससाठी पूर्ण सामने खेळू शकला नव्हता. सँटनरने आता एका पॉडकास्टमध्ये दावा केला आहे की, मुंबई इंडियन्सने त्याला करारातील मानधनाची केवळ अर्धीच रक्कम दिली आहे. मुंबई इंडियन्सने सँटनरला २ कोटी रुपयांच्या किमतीत रिटेन केलं होतं. दुखापतीचे निमित्त करून सँटनर न्यूझीलंडच्या कसोटी संघात सामील झाल्याचा आरोपही त्याच्यावर झाला होता. आता या सर्व वादावर खुद्द कीवी ऑलराउंडरने मौन सोडलं असून मुंबई इंडियन्सच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.

'द ग्रेड क्रिकेटर पॉडकास्ट'वर बोलताना मिचेल सँटनरने आयपीएल दरम्यान घडलेली संपूर्ण कहाणी सविस्तर सांगितली. तो म्हणाला की, माझ्या घरी दुसऱ्या बाळाचा जन्म झाल्यामुळे मी मुंबई इंडियन्सचा पहिला सामना खेळू शकलो नव्हतो. त्यानंतर मी दिल्लीविरुद्धचा सामना खेळलो, पण दुर्दैवाने त्याच सामन्यात माझ्या उजव्या खांद्याला दुखापत झाली. या दुखापतीतून सावरून जेव्हा मी पुन्हा संघात पुनरागमन केले, तेव्हा माझ्या डाव्या खांद्याला दुखापत झाली. या दुहेरी दुखापतींमुळे मला या संपूर्ण हंगामात केवळ ४ सामनेच खेळता आले.

# नेपाळसोबतच्या सीमा विवादात तिऱ्हाईताचा हस्तक्षेप नको; भारताची स्पष्ट भूमिका

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी भारत-नेपाळ सीमेसंदर्भात नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांच्या अलीकडील विधानावर प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी सांगितले की, दोन्ही देशांमधील सुमारे ९८% सीमा आधीच निश्चित करण्यात आली आहे, परंतु काही भागांवर अजूनही सहमती होणे बाकी आहे.

त्यांनी सांगितले की, गंडक नदीचा मार्ग बदलल्यामुळे काही भागांमध्ये सीमेसंदर्भात प्रश्न निर्माण झाले आहेत. याव्यतिरिक्त, काही ठिकाणी सीमापार अतिक्रमण आणि नो-मॅन्स लँडवरील अतिक्रमणाची प्रकरणे देखील आहेत, ज्यांचे दोन्ही देश मिळून मॅपिंग करत आहेत.परराष्ट्र मंत्रालयाच्या मते, सीमेसंदर्भातील सर्व मुद्द्यांवर चर्चा आणि निराकरणासाठी भारत आणि नेपाळ यांच्यात आधीपासूनच द्विपक्षीय यंत्रणा अस्तित्वात आहेत. भारत-नेपाळ सीमेचा प्रश्न दोन्ही देशांमधील विषय आहे आणि यात कोणत्याही तिसऱ्या पक्षाची कोणतीही भूमिका नाही.


## टी.सी. हरवली

माझी ऋषिकेश दिपक चौदंते या नावाची अकरावी विज्ञान पासची टी.सी. मुदखेड ते नांदेड बस प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**पत्ता. ऋषिकेश दिपक चौदंते**
**रा. मुदखेड ता. मुदखेड**
**जि. नांदेड**

## Change In Name

My Old Name is **SHAIKH KHADIR** Now I am Changing as a new Name **SHAIKH KHADIR SHAIKH MAHEBOOB** Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name Please kindly consider the same. FULL ADDRESS. H.NO.1-7-1695, NEAR FAHIM KIRANA GALLI NO 10, PEER BURHAN NAGAR NANDED MS 431605. MOB NO.9421295396.

## Change In Name

My Old Name is **Meghana Kahalekar** Now I am Changing as a new Name **Meghana Shivaji Kahalekar** Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name Please kindly consider the same.

**Old Address :- R/o. Kahaka Bk. Tq. Naigaon Dist. Nanded 431709**

**New Address : Plot No. 29, Nandkishor Nagar, Near BSNL Office, Purna Road Nanded Post. Taroda Bk. 431605**

**Mo.No. 9423126906**

## Change In Name

My Old Name is **ABDUL NAEEM ABDUL MANNAN.** Now I am Changing as a new Name **ABDUL NAEEM ABDUL MANNAN SAUDAGAR.** Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name Please kindly consider the same. FULL ADDRESS. H.NO.1-24-81, VIP ROAD MASTAN PURA CORNER NEW MONDHA NANDED MS 431602.

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लॅबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## रविंद्र शिक्षण प्रसारक मंडळ संचलित नेहरू विद्यार्थी वसतिगृह शारदानगर देगलूर प्रवेश देणे चालू आहे.

शासनमान्य मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह सन २०२६-२०२७ शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी ते १० वी वर्गात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात दि.१-६-२०२६ पासून जातीनिहाय टक्केवारीनुसार प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती (एस.टी) | १४ टक्के |
| ३ | वि.जा./भ.ज./व्ही.जे./एन.टी | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग | २ टक्के |
| ५ | इतर मागासवर्गीय | १५ टक्के |
| ६ | बिगर मागासवर्गीय | ५ टक्के |

**वैशिष्टये:-१.**मोफ त प्रवेश,भव्य व सुसज्ज हवेशीर इमारत, मोफ त भोजन व निवासाची सोय,जादा शिकवण्याची सोय, सर्व विद्यार्थ्यांना अंथरून पांघरून,ताट,वाटी, ग्लास पेटी व गणवेशाची मोफ त सोय, खेळासाठी पटांगण व वाचनासाठी वाचनालयाची सोय

**अधिक्षक**
**नेहरू विद्यार्थी वसतिगृह शारदानगर देगलूर**
**ता.देगलूर जि.नांदेड**
**मो.९८९०३९०८०२,९९७५१५७५९७**


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकार नामे सय्यद मुस्तफा पि. सय्यद मुसा, रा. सिडको नांदेड ता. जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून जाहीर प्रगटन देण्यात येते की, माझे पक्षकार यांनी असलम खान पि. मनसूर खान रा. गांधी चौक कंधार ता. कंधार, जि. नांदेड यांच्या जाती मालकी ताब्यातील ना.वा.श.मनपा नांदेड हद्दीतील मौजे वसरणी येथील जमीन सर्वे क्र. २६ पैकी एक प्लॉट आहे. ज्याचा प्लॉट क्र. २४६ असून, जो एस-२ मधील आहे. ज्याची लांबी पूर्व-पश्चिम ४० फुट व रुंदी दक्षिण उत्तर ३० फुट असून, ज्याचे एकूण क्षेत्रफळ १२०० चौ. फु. असून, ज्याची चतुःसीमा पूर्वेस- प्लॉट नं. २५० आहे. पश्चिमेस-२० फुट रुंद रोड आहे. दक्षिणेस-प्लॉट नं. २४७ व २४८ चा भाग आहे. उत्तरेस-प्लॉट नं. २४५ आहे. सदरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट हे माझ्या पक्षकाराने खरेदी करण्याचा करार केला असून, बयानापोटी काही रक्कम दिली आहे व लवकरच रजिस्ट्री विक्रीखत करून घेतला जाणार आहे.

जर वरील प्लॉटच्या व्यवहारासंबंधी कोणाचे काही आक्षेप, उजर असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील दिलेल्या पत्त्यावर आपले लेखी आक्षेप नोंदवावेत. मुदतीच्या आत कोणाचे आक्षेप आले नाही तर कोणाचे काही आक्षेप नाहीत असे गृहीत धरून माझे पक्षकार रजिस्ट्रीखत करून घेतील व मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही करिता हे जाहीर प्रगटन.

| मार्फत | जाहीर प्रगटन देणार |
|---|---|
| ॲड. पठाण आजम खान | सय्यद मुस्तफा पि. सय्यद मुसा |
| पत्ता-शिवाजीनगर, नांदेड | रा. सिडको, नांदेड ता. जि. नांदेड |
| मो. ९९६०२८१८९४ | मो. ९४२३६२६७६८ |

ੴ ਸਤਿਗੁਰ ਪ੍ਰਸਾਦਿ ॥

ਤਖ਼ਤ ਸੱਚਖੰਡ ਸ੍ਰੀ ਹਜ਼ੂਰ ਅਬਿਚਲਨਗਰ ਸਾਹਿਬ, ਨਾਂਦੇੜ-੪੩੧੬੦੧ (ਮਹਾਰਾਸ਼ਟਰ)-ਭਾਰਤ

**Takhat Sachkhand Sri Hazur Abchalnagar Sahib, Nanded-431601 (Maharashtra) -India**

Ph. No. 02462-234813, 241266, 243559, Fax No. 02462-234812
E-Mail-Contact@hazursahib.com Visit us at : http:www.hazursahib.com.

No. 567/26-27 Date 02/6/26

### TENDER NOTICE.

Sealed quotations /Tenders are invited from experienced Contractors/Fabricators for providing and Fixing Profile Tin Shade Work for Sahebjada Baba Fateh Singh Ji Mangal Karyalaya.Abchalnagar Sahib Nanded and also for other Departmental Works of Gurudwara Sahib Ji.

The Scope of work includes supply, Fabrication and Erection of MS Structural Frame Work, Providing and Fixing Color Coated/Profile GI Sheets with Welding, Fitting Fastening and Finishing work complete installation including Labour, Transportation and Accessories.

The eligible Contractor should have experience in Shade Fabrication/Profile Sheet Roofing work having GST Registration preferred and also similar work completion references may be required.

The Material should be of high quality brand, MS Structural Steel Frame Work, Paint and Galvanizing and Fabrication quality and Accuracy based on height, gauge and span size and cladding /gutters are also included. All the Material used should be strictly as per Indian standard cods Fabrication standards. Minimum 1 Year defect liability period Leakage, Vibration, Excessive Deflection or Corrosion during DLP to be rectified by Contractor.

Contractor are advised to visit site. All Rates for Frame and profile Sheet should be quoted as per Kg.

All the sizes /Types/standard for components and Section should be strictly as per Design and instructions of structural Engineer.

The last Date of submission of Sealed quotation Dt. 12-06-2026. up to 5.00 pm. during Office hours in favors of Superintendent Gurudwara Sachkhand Board ,Nanded.

The Authority reserves the Right to Accept or reject the Tender without assigning any reason.

Terms and Conditions :-
1. Rates should include Material, Labour, Transportation and Taxes .
2. Work should be completed within the specified timeline.
3. Frame Work, of Shade will be in Truss form.

Superintendent,
Gurudwara Sachkhand Board,Nanded.

## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# नांदेड परिक्षेत्रातील गुटखा व अंमली पदार्थ विरोधी मोहिमेत १३.८४ लाखांचा गुटखा जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दि. १ ते ३० जून, २०२६ दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात गुटखा व अंमली पदार्थ विरोधी मोहीम राबविण्याचे निश्चित केले आहे. याबाबतच्या सविस्तर सूचना परिक्षेत्रातील सर्व अधिकाऱ्यांना निर्गमित करण्यात आल्या आहेत. नांदेड परिक्षेत्रातील गुटखा व अमली पदार्थ विरोधी मोहिमेत १३.८४ लाखांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे.



या मोहिमेच्या दुसऱ्या दिवशी, गुटखा विक्री साठवणूक व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध ४ गुन्हे नोंदवत या व्यवसायात गुंतलेल्या एकूण ६ आरोपींना पोलिसांनी गजाआड केले आहे. या मोहिमेअंतर्गत, परिक्षेत्रातील नांदेड जिल्ह्यात १, हिंगोली जिल्ह्यात १ तर लातूर जिल्ह्यात २ अशा एकूण ४ कारवाया करण्यात आल्या असून, एकूण ६ आरोपींकडून १३ लाख ८४ हजार ७२१ रुपये किंमतीचा गुटखा व अन्य साहित्य जप्त करण्यात आले आहे.

जून महिन्यात नांदेड परिक्षेत्रात गुटखा व इतर प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात येत असून, सदर मोहिमेदरम्यान स्वादिष्ट/सुगंधित तंबाखू, अपमिश्रके युक्त चघळण्याची तंबाखू, स्वादिष्ट/सुगंधित सुपारी, गुटखा, पान मसाला, खर्रा, मावा व तत्सम पदार्थांची साठवण, वितरण व वाहतूक याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३ अन्वये कारवाई करण्यात येत आहे. उपरोक्त पदार्थांच्या संदर्भात संबंधितांविरुद्ध कलम १२३ बी.एन.एस. अन्वये करण्यात आलेल्या कारवाईचा खटला हा सत्र न्यायालयात चालणारा असून त्यास दहा वर्षेपर्यंत कारावासासह द्रव्य दंडाची देखील शिक्षा आहे.

**पान टपऱ्यांची व्यापक तपासणी मोहीम :** गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची पानटपऱ्यांवरून होणारी विक्री थांबविण्यासाठी पोलिसांनी पान टपऱ्यांची व्यापक तपासणी मोहीम हाती घेतली आहे. काल दिवसभरात नांदेड परिक्षेत्रात एकूण २६४ पान टपऱ्यांची तपासणी करण्यात आली असून, गुटखा व अंमली पदार्थांच्या संभाव्य साठवणुकीच्या ठिकाणांची व्यापक तपासणी हाती घेण्यात आली आहे.

## गॅस सिलेंडर घेऊन घरी परतताना काळाचा घाला; पित्याचा जागीच मृत्यू, मुलगा गंभीर

**मुखेड (प्रतिनिधी)** –तालुक्यातील मंग्याळ येथील पिता-पुत्रांवर काळाने घाला घातल्याची दुर्दैवी घटना दि. २ जून रोजी घडली. स्वयंपाकाचा गॅस संपल्याने नवीन गॅस सिलेंडर घेण्यासाठी मुखेडकडे आले व सदरील गॅससिलेंडर घेऊन जात असताना दुचाकी व छोटा हत्ती यांच्यात आमने सामने झालेल्या अपघातात वडिलांचा मृत्यू झाला आहे. तर मुलगा गंभीर जखमी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मंग्याळ येथील राहुल श्रावण सोनकांबळे (वय ४०) व त्यांचा मुलगा जितेंद्र राहुल सोनकांबळे (वय १५) हे दोघे मोटारसायकलने स्वयंपाकासाठी गॅस सिलेंडर घेण्यासाठी मुखेड येथे आले व गॅस सिलेंडर घेऊन गावाकडे जात असताना मुखेडजवळील दबडे शिरूर पाटी परिसरात त्यांच्या दुचाकीला एका छोटा हत्ती यांची जोरदार धडक बसली. या भीषण अपघातात राहुल सोनकांबळे गंभीर जखमी झाले. नागरिकांच्या मदतीने त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंति त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे मंग्याळ परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघातात जखमी झालेला त्यांचा मुलगा जितेंद्र याच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले आहे. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळत आहे.

## मुंबईतील फरार आरोपी नांदेड पोलिसांनी केला जेरबंद



**नांदेड (प्रतिनिधी)** –मुंबईतील निर्मलनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अल्पवयीन मुलीवरील बलात्कार प्रकरणातील फरार आरोपीला नांदेड ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे.

निर्मलनगर पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा क्रमांक ३३४/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम ६५ (१), ७४, ७७, ३५१(१) तसेच लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण (पोक्सो) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील आरोपी मोहम्मद आवेश मोहम्मद गौस मणियार (वय २६ वर्षे, रा. खुदबेनगर, नांदेड) हा गुन्हा दाखल झाल्यापासून फरार होता. नांदेड ग्रामीण पोलिसांना आरोपी हा नांदेड येथे असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर नांदेड ग्रामीण पोलिसांनी निर्मलनगर पोलीस ठाण्याच्या पथकाशी समन्वय साधून संयुक्त कारवाई केली.

गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा शोध घेत त्याला नांदेड शहरातील एका ठिकाणाहून ताब्यात घेतले. आरोपी पळून जाण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी सापळा रचून त्याला अटक केली. पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी आरोपीला निर्मलनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## दुचाकी चोरटा नांदेड ग्रामीण पोलिसांच्या जाळ्यात; चोरीच्या पाच मोटारसायकली जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी सुरू केलेल्या क्रॅक डाऊन मोहिमे अंतर्गत नांदेड ग्रामीण पोलिसांनी दुचाकी चोरीच्या प्रकरणाचा छडा लावत ३ लाख रुपये किमतीच्या पाच चोरीच्या दुचाकी जप्त केल्या आहेत. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली.



नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. शिवाजी राजाराम निलपत्रेवार (वय ४६, रा. विनकर कॉलनी, धनगाव, नांदेड) यांनी ३१ मे २०२६ रोजी तक्रार दिली होती. त्यांची दुचाकी ३१ मे रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.४५ वाजण्याच्या दरम्यान सरस्वती दवाखान्यासमोर, विष्णुपुरी येथून चोरीला गेली होती.

गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत लखन शिवाजी हातागळे (वय २१, रा. नवी आबादी, मुखेड) याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने दुचाकी चोरीची कबुली दिली. एवढेच नाही तर पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी त्याची अधिक चौकशी केली असता त्याने अन्य ठिकाणाहून चोरलेल्या पाच दुचाकी पोलिसांच्या स्वाधीन केल्या आहेत.

## नांदेड जिल्हा सेपकटाकरॉ ज्युनियर व सिनियर मुला-मुलींचा संघ जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र सेपकटाकरॉ असोसिएशनच्या मान्यतेने व नागपूर जिल्हा सेपकटाकरॉ असोसिएशनच्यावतीने गुरुवार, दि. ४ ते ७ जून या कालावधीत ३६ वी सिनियर व २७ वी ज्युनियर महाराष्ट्र सेपकटाकरॉ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत नांदेड जिल्ह्याचा संघ निवडण्यासाठी दि. १ जून २०२६ रोजी जिल्हा निवड चाचणी घेण्यात आली. या निवड चाचणीत जिल्हा ज्युनिअर व सिनिअर संघाची निवड करण्यात आली.

या निवड चाचणीत सिनियर व ज्युनियर वयोगटासाठी मिळून ५० ते ६० खेळाडूंनी सहभाग नोंदवला. या निवड चाचणीसाठी निवड चाचणी समितीचे अध्यक्ष रविकुमार बकवाड, सदस्य म्हणून क्रीडा शिक्षक कपिल सोनकांबळे, दिलीप सूर्यवंशी यांनी काम पाहिले.

यावेळी निवडण्यात आलेला जिल्हा संघ असा-असंग जोंधळे, सुदेश कांबळे, क्षितिज सूर्यवंशी, रोहित सूर्यवंशी, शुभम यादव, ओमकार चव्हाण, आनंद पंडित, कुलदीप दुधमल, बजरंग शेणेवाड, गंगाधर जोगदंड, विलास वसुरे, माधव शिंदे, सुमेध जाधव, स्वप्नील खानसोळे, ज्ञानेश्वर मामिडवार, सृष्टी नरवाडे, सृष्टी जंगीलवाड, दीक्षा सोनाळे, आर्या आचरे, आस्था झरेकर, तपस्या माने, वैष्णवी सुगावकर, रोहिणी मल्हारे, अक्षता रोनटेवाड, शरयू सेनेवाड, ज्योती येवलवाड, राणी येवलवाड, आरती ठाकूर, श्रद्धा अवस्थी, प्रशंसा



वाडीकर ३६ वी सिनियर महाराष्ट्र सेपकटाकरॉ स्पर्धेसाठी निवड झाली तर ज्युनियर गटात आर्यन केशीटीवार, रोहन फड, आदित्य पांगरेकर, विराज इंगोले, यश गायकवाड, श्रेयस कांबळे, राहुल देठे, वीर पाटील, अद्वित वेताळ, राजवीर वरेकर, सुमित मुंगल, यशवंत मुंगल, पृथ्वीराज गुंडाळे, निरंजन चिलवंतकर, विकास वसुरे, सृष्टी नरवाडे, सृष्टी जंगीलवाड, दीक्षा सोनाळे, आर्या आचरे, आस्था झरेकर, तपस्या माने, अंजली मंडलिक, सेजल पवार, अक्षरा लोखंडे, श्रेया भोंगे, अंकिता जाधव आदी खेळाडूंची २७ वी ज्युनियर महाराष्ट्र सेपकटाकरॉ स्पर्धेसाठी निवड झाली.

या दोन्ही गटात निवड झालेले खेळाडू ३ जून २०२६ रोजी नागपूर येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेत सहभागी होणार आहेत. रविकुमार बकवाड प्रशिक्षक म्हणून तर दिलीप सूर्यवंशी संघ व्यवस्थापक म्हणून संघासोबत राहणार आहेत. यावेळी निवड आलेल्या खेळाडूंना क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे, क्रीडा अधिकारी बालाजी शिरसीकर, संजय बेतीवार जिल्हा संघटनेचे सचिव प्रवीणकुमार कुपटीकर, रविकुमार बकवाड, कपिल सोनकांबळे निवड समिती सदस्य आदींनी शुभेच्छा दिल्या.

## भीमराव दुधारे यांचे निधन

**भोकर (प्रतिनिधी)** – येथील



माजी ग्रा. पं. सदस्य भीमराव दुधारे यांचे बुधवार दि.३ जून रोजी सकाळी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

बुधवार, दि. ३ जून रोजी सायंकाळी ६ वाजता भोकर येथील बौद्ध स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले. यांच्या पश्चात पत्नी, ४ मुली, १ मुलगा, नातू असा परिवार आहे.

## ग्रामीण पोलीस स्टेशनचे सपोनि सचिन गढवे यांच्यासह तीन उपनिरीक्षकांच्या बदल्या

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –ग्रामीण पोलीस स्टेशन येथे कार्यरत सहायक पोलीस निरीक्षक सचिन गढवे व उपनिरीक्षक महेश गायकवाड यांची लातूर येथे तर उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड विमानतळ व ज्ञानेश्वर भोसले यांची वजीराबाद येथे बदली झाली आहे. सहायक पोलीस निरीक्षक रेखा काळे यांची एका वर्षाकरिता बदलीला स्थगिती देण्यात आली असून, सपोनि गढवे यांना पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या उपस्थितीत कार्यमुक्त करण्यात येऊन त्यांना निरोप देण्यात आला.

नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या आदेशानुसार सहायक



पोलीस निरीक्षक सचिन गढवे व उपनिरीक्षक महेश गायकवाड यांची लातूरला बदली झाली आहे तर जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्हा अंतर्गत ग्रामीण पोलीस स्टेशन येथील उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड यांची विमानतळ व ज्ञानेश्वर भोसले यांची वजिराबाद पोलीस स्टेशन येथे बदली करण्यात आली आहे. तसेच सहायक पोलीस निरीक्षक रेखा काळे यांची एका वर्षासाठी बदलीला स्थगिती देण्यात आली आहे.

## तिरूपती-जालना-तिरूपती विशेष गाड्यांच्या फेऱ्यांना मुदतवाढ

**नांदेड (प्रतिनिधी)** –प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने तिरुपती-जालना- तिरुपती दरम्यान चालविण्यात येणाऱ्या विशेष गाड्यांच्या सेवेला मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. या गाड्या विद्यमान वेळापत्रक, थांबे, डब्यांची रचना व देखभाल व्यवस्थेनुसारच धावतील. तसेच या विशेष गाड्यांसाठी १.३ पट विशेष भाडे लागू राहील, असे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

गाडी क्रमांक ०७८१४ जालना तिरुपती विशेष (प्रत्येक गुरुवारी) यापूर्वी २५ जूनपर्यंत अधिसूचित होती. आता या गाडीच्या २ जुलै ते २४ सप्टेंबर या कालावधीत आणखी १४ फेऱ्या चालविण्यात येणार आहेत. गाडी क्रमांक ०७८१५ तिरुपती-जालना विशेष (प्रत्येक शुक्रवारी) यापूर्वी २६ जूनपर्यंत अधिसूचित होती. या गाडीची सेवा ३ जुलै ते २५ सप्टेंबर या कालावधीत १४ अतिरिक्त फेऱ्यांसाठी वाढविण्यात आली आहे. या निर्णयामुळे मराठवाडा व आंध्र प्रदेशातील प्रवाशांना अतिरिक्त प्रवास सुविधा उपलब्ध होणार असून, वाढत्या प्रवासी मागणीची पूर्तता करण्यास मदत होईल. दक्षिण मध्य रेल्वेने प्रवाशांनी या विशेष सेवेचा लाभ घ्यावा, तसेच प्रवासापूर्वी अधिकृत रेल्वे चौकशी प्रणालीद्वारे वेळापत्रक व आरक्षण स्थिती तपासून घ्यावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

## मारोतराव पवार यांचे निधन

**मुदखेड (प्रतिनिधी)** – निवघा येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापकमारोतराव तानाजीराव पवार (वय ८२) यांचे बुधवार, दि. ३ जून २०२६ रोजी पहाटे ५ वाजता निधन झाले.



त्यांच्या पश्चात एक भाऊ, दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर मौजे निवघा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ते कैलास पवार तसेच जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे संघटक भगवान पवार यांचे वडील होत.

## गुणवंत विद्यार्थी व विविध स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान



**अर्धापूर (प्रतिनिधी)** – नगरपंचायतीच्या वतीने राजमाता पू. अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. नगर पंचायतीच्या वतीने तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सौ. वैशालीताई देशमुख यांची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सौ. डॉ. दामिनी नितीन हाके, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, उपनगराध्यक्ष मुक्तेदर खान, चेअरमन प्रवीण देशमुख आदी उपस्थित होते.

तालुक्यातील इयत्ता १० व १२ वी तसेच स्पर्धा परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार नगर पंचायत प्रशासनाने राजमाता पू. अहिल्यादेवी होळकर जयंती दिनी केला. दहावी बोर्ड परीक्षेत ९० टक्के आणि बारावी बोर्ड परीक्षेत ८५ टक्के गुण मिळवलेल्या व विविध स्पर्धा परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे यांनी तर सूत्रसंचालन सौ. अंकिता टिकार यांनी केले. शेवटी सुंदर सरगर यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी व गावकरी मंडळी उपस्थित होते.

# नांदेड आकाशवाणी केंद्राच्या बळकटीकरणासाठी प्रयत्न करणार -खा. अशोकराव चव्हाण

### स्थानिक कलाकारांना व्यासपीठ आणि दर्जेदार कार्यक्रमांसाठी दिल्लीस्तरावर पाठपुरावा करणार

**नांदेड (प्रतिनिधी)** –माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी नांदेड आकाशवाणी केंद्राच्या विकासासाठी सकारात्मक आणि ठोस भूमिका घेत केंद्राच्या विविध प्रश्नांवर गांभीर्याने लक्ष देण्याची ग्वाही दिली आहे. नांदेड आकाशवाणी केंद्राची तरंग लांबी वाढविणे, ग्रामीण भागात स्पष्ट आणि दर्जेदार प्रसारण उपलब्ध करून देणे, तसेच स्थानिक कलाकार, साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींना पुन्हा व्यापक व्यासपीठ मिळावे यासाठी आपण स्वतः केंद्रीय मंत्र्यांसह प्रसार भारतीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गुणवंतराव पाटील, गोविंदराव मुंडकर, भाऊराव मोरे, बसवराज वडिले आणि प्रकाश कराळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाशी बुधवार, दि. ३ जून २०२६ रोजी सविस्तर चर्चा करताना चव्हाण यांनी



नांदेड आकाशवाणी केंद्र हे केवळ प्रसारण माध्यम नसून मराठवाड्याच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक जीवनाचे महत्त्वपूर्ण केंद्र असल्याचे नमूद केले. ग्रामीण भागातील लोककला, साहित्य, सामाजिक जाणिवा आणि स्थानिक प्रतिभेला आवाज देण्याचे मोठे कार्य या केंद्राने अनेक वर्षे केले आहे. या परंपरेला नवसंजीवनी देण्याची आवश्यकता आहे, असे ते म्हणाले.

चव्हाण यांनी सांगितले की, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा माजी केंद्रीय गृहमंत्री स्वर्गीय शंकरराव चव्हाण यांच्या पुढाकारातून वसरणीच्या माळावर सुरू झालेले नांदेड एफएम केंद्र हे मराठवाड्याच्या सांस्कृतिक विकासातील एक महत्त्वाचा टप्पा होता. या केंद्रामुळे ग्रामीण भागातील कलाकार, शेतकरी, विद्यार्थी, साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांना अभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम उपलब्ध झाले. आजही अनेक ज्येष्ठ नागरिक, श्रोते आणि कलाकार या केंद्राशी भावनिकदृष्ट्या जोडलेले आहेत. यावेळी त्यांनी ग्रामीण भागातील प्रसारण समस्येकडे विशेष लक्ष वेधले. तरंग लांबी कमी असल्यामुळे अनेक गावांमध्ये आकाशवाणीचे कार्यक्रम स्पष्ट ऐकू येत नाहीत. माहिती, शिक्षण, कृषी मार्गदर्शन, संस्कृती आणि लोकजागृतीसाठी आकाशवाणीची भूमिका आजही अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे प्रसारण क्षमता वाढविणे ही काळाची गरज आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

स्थानिक कलाकारांसाठी पूर्वी सुरू असलेले सकाळ आणि संध्याकाळचे कार्यक्रम पुन्हा सुरू करण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. ग्रामीण भागात असंख्य प्रतिभावान कलाकार आहेत. लोकगीत, भारूड, कथा, साहित्य, सामाजिक विषय आणि युवकांच्या कलागुणांना आकाशवाणीमुळे व्यापक व्यासपीठ मिळू शकते. स्थानिक कलाकारांना संधी देणे म्हणजे मराठवाड्याच्या संस्कृतीचे जतन करणे होय, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी आकाशवाणीच्या प्रशासनालाही सकारात्मक सूचना दिल्या. अधिकाऱ्यांनी स्थानिक पातळीवर वास्तव्यास राहून नागरिक, श्रोते आणि कलाकारांशी थेट संवाद साधला पाहिजे. प्रत्यक्ष समस्यांची माहिती घेतल्यास अधिक प्रभावीपणे सुधारणा करता येतील, असे त्यांनी नमूद केले.

शिष्टमंडळाने यावेळी नांदेड आकाशवाणी केंद्र अधिक लोकाभिमुख करण्यासाठी अनेक विधायक सूचना मांडल्या. त्यामध्ये ग्रामीण भागासाठी स्वतंत्र कार्यक्रम, शेतकरी आणि विद्यार्थ्यांसाठी विशेष मालिका, स्थानिक कलाकारांना नियमित संधी, सामाजिक आणि सांस्कृतिक विषयांवरील चर्चासत्रे, तसेच प्रसारण क्षमता वाढविण्याच्या मागण्या प्रमुख होत्या. दरम्यान, नांदेड आकाशवाणी केंद्राबाबत जनतेमध्ये नव्याने आशावाद निर्माण झाला असून, केंद्राचे वैभव पुन्हा प्राप्त व्हावे अशी भावना व्यक्त होत आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेलः godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com